। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २२१ वा । शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### एक लाखसह चेकबुक,महत्वाच्या कागदपत्राची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी नामे- अशोक मारुती वाघमोडे, वय ५० वर्षे, रा.येसवंडी ता.वाशी जि. धाराशिव यांनी दि.११.११.२०२५ रोजी स्टेट बॅक ऑफ इंडिया येथुन १,००,००० घेवून मोटरसायकलवरुन जात होते. दरम्यान एस बी आय बॅक ते वरद हॉटेल जवळ भुम येथे अज्ञात व्यक्तीने अशोक वाघमोडे यांचे मोटरसायकलवरील कव्हर मध्ये ठेवलेले १,००,०००, एस बी आय बॅंकेचे चेकबुक, एसबीआय बॅंकेचे पासबुक, एटीएम कार्ड, जनता बॅंकेचे पासबुक, आधार कार्ड, पॅन कार्ड चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अशोक वाघमोडे यांनी दि.१२.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पिस्टल जप्त करुन गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत नाना कैकाडगल्ली भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.११.११.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरी लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक पिस्टल सदृश्य अग्नीशस्त्र बॅरलची लांबी १६ सेमी व मॅगझीनची लांबी १० सेमी रुंदी ३ सेमी एकुण ३०,००० किंमतीची विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला भुम पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद पिस्टल जप्त करुन फिर्यादी नामे- अख्तर जब्बार सय्यद, पोलीस उप निरीक्षक, नेमणुक भुम पोलीस ठाणे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ३,२५ अन्वये भुम पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### सोलार डीसी केबल व आदि वस्तूची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अदित्य आनंदराव कुलकर्णी, वय ३२ वर्षे, रा.गजानन महाराज मंदीर विक्रम नगर लातुर ता. जि.लातुर यांची एमआरपी ईन्फ्रा ॲन्ड पॉवर प्रायव्हेट लिमीटेड लातुर या कंपनीचे आर आर काबील सोलार डीसी केबल १० बंडल एकुण १,२०,००० किंमतीचे हे दि. १२.१०.२०२५ रोजी उपळा शिवार येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अदित्य कुलकर्णी यांनी दि.१२.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१२ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २३३ कारवाया करुन १,८८,२५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिलासा : शेती पुनर्वसनासाठी मनरेगातून ५ लाखांपर्यंत अनुदान

### सिंचन विहिर दुरुस्तीकरिता ३० हजार रुपयांपर्यंत मदत ;शेतकऱ्यांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका) सन २०२५-२६ या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर शासन व मनरेगा विभागाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विशेष पुनर्वसन उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) पुढीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यात येणार आहे.खरडून गेलेल्या शेतीजमिनींच्या पुनर्वसनासाठी प्रति हेक्टर ३ लाख रुपये,तसेच जास्तीत जास्त २ हेक्टरपर्यंत ५ लाख रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे. खचलेल्या किंवा बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीकरिता प्रति विहीर ३० हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येणार आहे.

या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीजमिनी व सिंचन साधनांची पूर्वस्थिती पुनर्संचयित करण्यास मदत होईल.परिणामी, आगामी हंगामात शेती पुन्हा सक्षम व उत्पादनक्षम होईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की,त्यांनी आपले प्रस्ताव संबंधित गटविकास अधिकारी (पंचायत समिती) यांचेकडे सादर करावेत.तपासणी व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

## पशुपालनाला कृषीचा दर्जा - पशुपालकांना वीजदर,कर व व्याजात सवलतींचा लाभ



धाराशिव (जिमाका) पशुपालन व्यवसायाला आता कृषी व्यवसायाचा समकक्ष दर्जा देण्यात आला असून,या निर्णयामुळे लघु आणि मध्यम स्वरूपाच्या पशुपालकांना कृषीच्या धर्तीवर विविध सवलतींचा लाभ मिळणार आहे.या निर्णयामुळे पशुपालकांच्या उत्पादन खर्चात घट होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी या निर्णयासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता.परिणामी शासनाने पशुपालनाला कृषी व्यवसायाचा दर्जा मंजूर केला आहे. या अंतर्गत पशुपालकांना वीज सवलत,ग्रामपंचायत करातील सवलत,तसेच कर्जावरील व्याज सवलत मिळणार आहे.

या निर्णयामुळे पशुपालकांच्या खर्चात बचत होऊन त्यांना आर्थिक दिलासा मिळेल,असे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी सांगितले. तसेच वीजदरातील सवलतीचा लाभ घेण्यासाठी पात्र पशुपालकांनी महावितरण कार्यालयाशी व पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा,असे आवाहनही त्यांनी केले आहे.

**पशुपालन युनिट्सना मिळणार वीजदर सवलतीचा लाभ :**

२५ हजार किंवा त्यापेक्षा कमी मांसल कुक्कुट पक्षी,५० हजार किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादन करणारे पक्षी,४५ हजार क्षमतेपर्यंत हॅचरी युनिट, १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा.५०० किंवा त्यापेक्षा कमी शेळ्या/मेंढ्या असलेला गोठा.२०० किंवा त्यापेक्षा कमी वराहपालन युनिट,पशुपालन प्रकल्पातील पशुगृह,चारा/पशुखाद्य निर्मिती केंद्र,पाण्याची यंत्रणा,प्रक्रिया केंद्र,कोल्ड स्टोरेज व शीतसाखळी यंत्रणा. वरील सर्व युनिट्ससाठी सवलतीच्या दरात वीज वापरण्याची परवानगी दिली जाणार आहे. पशुसंवर्धन व्यवसायाला कृषी दर्जा लागू झाल्याने ग्रामीण भागातील पशुपालकांना आर्थिक बळकटी मिळेल व पशुधन विकासाला नवी दिशा मिळेल,असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

**वीज सवलत मिळविण्यासाठी आवश्यक अटी :**

पशुपालकांनी जिल्हा उपआयुक्त (पशुसंवर्धन) कार्यालयात नोंदणी करणे बंधनकारक.सर्व पशुधनाची नोंदणी भारत पशुधन पोर्टलवर करणे आवश्यक. वीज वितरण कंपनीमार्फत स्वतंत्र मीटर बसविणे आवश्यक आहे.

नवीन लाभार्थी पशुपालकांनी वीज जोडणीसाठी संबंधित उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) यांच्याकडे ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा.सादर केलेल्या अर्जाची प्रत तालुका सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना देणे आवश्यक आहे,असे डॉ.मनोज घाटे (जिल्हा उपआयुक्त,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) आणि डॉ.मुकुंद तावरे (सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन) यांनी सांगितले आहे.

## धाराशिवमध्ये १७ व १८ नोव्हेंबर रोजी त्रिजिल्हास्तरीय 'इन्स्पायर अवॉर्ड' प्रदर्शन

### धाराशिव,लातूर व नांदेड जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची नाविन्यपूर्ण प्रकल्प मांडणी

धाराशिव,दि.१३ नोव्हेंबर (जिमाका) सन २०२३-२४ व २०२४-२५ या दोन शैक्षणिक वर्षातील धाराशिव,लातूर व नांदेड जिल्ह्यांचे जिल्हास्तरीय 'इन्स्पायर अवॉर्ड' प्रदर्शन यावर्षी धाराशिव जिल्ह्यात आयोजित करण्यात आले आहे.

या प्रदर्शनासाठी दिलेल्या सूचनांनुसार,हे त्रिजिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शन दिनांक १७ व १८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ज्ञान प्रबोधिनी,हराळी (ता.लोहारा) येथे होणार आहे.

या प्रदर्शनात एकूण १९९ विद्यार्थी, १९९ पालक,तसेच व्यवस्थापनाशी संबंधित ५० प्रतिनिधी सहभागी होणार असून,याशिवाय प्रदर्शन पाहण्यासाठी जिल्ह्यातील सुमारे १००० विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.प्रदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात येईल. शिक्षण क्षेत्रातील सृजनशीलतेला चालना देणाऱ्या या उपक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे,असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,धाराशिव यांनी केले आहे.

## नेत्रदान संदर्भात जनजागृतीपर उपक्रम उत्साहात




धाराशिव, (जिमाका)- जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष,जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्यातर्फे तुलसी महिला मंडळ बीड संचलित माता रमाबाई कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय तसेच नालंदा कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन,धाराशिव येथे नेत्रदान संदर्भात जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात कक्षाचे सदस्य तथा समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) श्री.मनेश खंडागळे यांनी मानवी डोळा,नेत्रदान व त्याचे महत्व,नेत्रदान कोण करू शकते आणि कोण करू शकत नाही,नेत्रदानाची प्रक्रिया व घ्यावयाची काळजी तसेच नेत्रदानाबद्दलचे गैरसमज याबाबत माहिती दिली. या प्रसंगी दोन्ही महाविद्यालयांच्या प्राचार्या डॉ.शैलजा पैकेकर आणि प्रा. मीना गदेराव,एनएसएस प्रोग्राम ऑफिसर प्रा.सौरभ भडंगे आणि प्रा. अर्चना कुवरा,विद्यार्थिनी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. हा उपक्रम कक्षाचे अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरज मोटे यांच्या मार्गदर्शनात,सहकारी तुकाराम डोलारे,महारुद्र नक्षे आणि निरामयसेवा फाऊंडेशनचे कर्मचारी ज्ञानेश्वर टिंगरे यांच्या सहकार्याने राबविण्यात आला.यावेळी वक्त्याने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत उपस्थितांनी नेत्रदानाची शपथ घेतली आणि मरणोत्तर नेत्रदानासाठी नोंदणी केली.

## १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर : कुष्ठरोग शोध अभियान

### जनतेने सहकार्य करावे जिल्हा प्रशासनाचे आवाहन



धाराशिव,दि. १३ नोव्हेंबर (जिमाका) केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत देशभरातील कुष्ठरोगाचा प्रसार 'शून्यावर' आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.या अनुषंगाने समाजात लपून राहिलेल्या नव्या कुष्ठरुग्णांचा शोध घेऊन त्यांना बहुविध औषधोपचार (एम.डी.टी.) सुरू करणे आणि रोगप्रसाराची साखळी खंडित करणे हा एकमेव प्रभावी पर्याय असल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले आहे.

या उद्देशाने जिल्ह्यात दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत 'कुष्ठरोग शोध अभियान' राबविण्यात येणार आहे.या मोहिमेत आरोग्य कर्मचारी,आशा कार्यकर्त्या व प्रशिक्षित पुरुष स्वयंसेवक यांच्या सहकार्याने ग्रामीण भागात संपूर्ण लोकसंख्येचे तसेच शहरी भागातील अतिजोखमीच्या क्षेत्रांतील घराघरात सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणामध्ये प्रत्येक कुटुंबातील स्त्रियांची तपासणी आशा कार्यकर्त्या तर पुरुषांची तपासणी पुरुष स्वयंसेवक करतील.या तपासणीदरम्यान आढळणाऱ्या संशयित रुग्णांची नोंद घेण्यात येईल. त्यानंतर उपकेंद्र स्तरावर समुदाय आरोग्य अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र/ग्रामिण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालयस्तरावर वैद्यकीय अधिकारी तसेच जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयस्तरावर त्वचारोग तज्ञ यांच्यामार्फत संशयितांची तपासणी करून रोगनिदान निश्चित करण्यात येईल. निदान झालेल्या सर्व नव्या रुग्णांना तात्काळ बहुविध औषधोपचार सुरू करण्यात येतील.

लवकर निदान आणि नियमित पूर्ण उपचार केल्यास कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो,असे वैद्यकीय अधिष्ठात्यांनी सांगितले.या मोहिमेचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुकास्तरावर तहसीलदार आणि गटविकास अधिकारी,पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.या समित्यांच्या बैठका घेऊन अभियानाची कार्यवाही यशस्वीपणे पार पाडण्यासाठी नियोजन करण्यात येणार आहे.

संपूर्ण जिल्ह्यात ३ लक्ष ९ हजार ५०० घरांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून,१५ लक्ष ४७ हजार ५०१ लोकसंख्येची प्रत्यक्ष तपासणी होणार आहे.यासाठी १,२०२ सर्वेक्षण पथके तयार करण्यात आली आहे. त्यांचे पर्यवेक्षण २४० पर्यवेक्षकांमार्फत केले जाणार आहे.प्रत्येक पथक ग्रामीण भागात दररोज २० ते २५ आणि शहरी भागात ३० घरांचे सर्वेक्षण करेल.या मोहिमेच्या कालावधीत जिल्हास्तर,विभागीय आणि राज्यस्तरावरील अधिकारी/कर्मचारी जिल्ह्याला भेट देऊन अभियानाची पाहणी करतील.

**कुष्ठरोगाची संशयास्पद लक्षणे :**

१) त्वचेवर फिकट किंवा लालसर बधिर चट्टा,ज्यावर घाम येत नाही आणि थंड-गरम संवेदना जाणवत नाहीत.२) जाड व दुखणाऱ्या मज्जातंतू (नसा).३) त्वचेवर गाठी असणे.४) तेलकट व बकाकणारी त्वचा.५) स्नायूंच्या पाळ्या जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे,डोळे पूर्णपणे बंद न होणे.६) हातापायाला मुंग्या येणे, तळहात/पाय बधिर होणे अथवा जखमा होणे.७) हातापायांची बोटे वाकडी होणे, हात मनगटापासून किंवा पाय पोटऱ्यांपासून लुळा पडणे.८) हात व पायात अशक्तपणा जाणवणे,हातातून वस्तू गळून पडणे,चालताना चप्पल गळून पडणे ही लक्षणे आढळल्यास आपल्या घरी येणाऱ्या सर्वेक्षण कर्मचाऱ्यांना दाखवून तपासणी करून घ्यावी.आपल्याला कुष्ठरोग तर नाही ना याची खात्री करून घ्यावी आणि आपला जिल्हा कुष्ठरोगमुक्त करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी, अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जिल्हा शल्यचिकित्सक,जिल्हा रुग्णालय, धाराशिव,जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद धाराशिव आणि सहाय्यक संचालक (कुष्ठरोग), धाराशिव यांनी केले आहे.

## रब्बी हंगामासाठी पिक विमा भरण्याची अंतिम मुदत जाहीर रब्बी ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर,गहू, हरभरा व रब्बी कांद्यासाठी १५ डिसेंबर अंतिम तारीख

धाराशिव,(जिमाका)- रब्बी हंगामात नैसर्गिक आपत्ती,किड व रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत शेतकरी नोंदणीसाठी राष्ट्रीय विमा संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे.

चालू रब्बी हंगामात कर्जदार व बिगरकर्जदार शेतकऱ्यांना पिक विम्याचा हप्ता भरण्याची अंतिम मुदत पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे - रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) : ३० नोव्हेंबर २०२५,गहू (बागायत), हरभरा व रब्बी कांदा : १५ डिसेंबर २०२५,उन्हाळी भुईमूग : ३१ मार्च २०२६ आहे.

ही योजना कर्जदार तसेच बिगरकर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक असून,कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास त्यांनी अधिसूचित पिकांसाठी नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधीपर्यंत संबंधित बॅंकेस विमा हप्ता कपात न करण्याबाबत घोषणापत्र देणे आवश्यक आहे.जे शेतकरी असे घोषणापत्र सादर करणार नाहीत, त्यांचा योजनेत सहभाग बंधनकारक मानला जाईल.

प्रती हेक्टर विमा हप्ता दर पुढीलप्रमाणे : रब्बी ज्वारी (बागायत) - विमा संरक्षण ३६ हजार रुपये प्रति हेक्टर,४५० रुपये शेतकरी हिस्सा प्रति हेक्टर,रब्बी ज्वारी (जिरायत)३६ हजार रुपये,४५० रुपये शेतकरी हिस्सा प्रति हेक्टर, गहू (बागायत) - ४५ हजार रुपये,५६२ रुपये ५० पैसे, हरभरा -३६ हजार रुपये ,४५० रुपये शेतकरी हिस्सा प्रति हेक्टर,रब्बी कांदा - ९० हजार रुपये,१,१२५ रुपये शेतकरी हिस्सा प्रति हेक्टर,उन्हाळी भुईमूग - ४० हजार ६०० रुपये,५०७ रुपये ५० पैसे शेतकरी हिस्सा प्रति हेक्टर असा आहे.

शेतकऱ्यांनी ज्या पिकाची पेरणी केलेली आहे,त्या पिकाबाबतचे स्वयंघोषणापत्र, सातबारा उतारा,आधारकार्ड व बॅंक पासबुकची प्रत यांसह जवळच्या बॅंकेत अथवा 'आपले सरकार सेवा केंद्रा'वर जाऊन विमा हप्ता भरून आपले पीक संरक्षित करावे.

शेतकऱ्यांनी या योजनेत जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा,असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव यांनी आवाहन केले आहे. तसेच अधिक माहितीसाठी ु.षिलू.र्सी.ळप या संकेतस्थळाचा वापर करावा किंवा नजिकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा,असेही त्यांनी सांगितले आहे.

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- भुम पोलीस ठाण अंतर्गत रमेश रा. रामहरीनगर भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१२.११.२०२५ रोजी १ आपल्या ताब्यातील स्वीफट डिझायर क्र एमएच ४० एल.पी.७०२३ ही ओंकार चौक भुम येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना भुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये भुम पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे. तसेच परंडा पोलीस ठाण अंतर्गत बाब रा. सोमवार गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव, चाचाकी पिकअप क्र एमएच २५ पी ३९१७ चा चालक यांनी दि.१२.११.२०२५ रोज आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे महिंद्रा आल्फ क्र एमएच १२ ईक्यु ४४२७ व पिकअप क्र एमएच २५ पी ३९१७ ही वाहने चौधरी दुकानासमोर परंडा बार्शी रोडवर परंडा येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये परंडा पो. ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जनतेनी सावध झाले पाहिजे

दिल्लीतील घटना विचार करणारी आहे. आता अशा बाबीकडे लक्ष नाही दिल्यास आगामी काळात मोठे संकट उभा राहू शकते कारण अनंतनागमधील 'एके ४७'सह अटक केलेला डॉ. अहमद राठर आणि डॉ. अदिल यांसह अन्य जम्मू-काश्मीरमधील ५ जण; चीनमध्ये शिक्षण घेतलेला कर्णावतीमधील डॉ. अहमद सय्यद, फरीदाबादमधील डॉ. शाहीन शाहिद अन् ३६० किलो बाँब बनवण्यात वापरले जाणारे अमोनियम नायट्रेट असणारा डॉ. मुजम्मिल यांची एकामागोमाग होणारी अटक आणि या पार्श्वभूमीवर १० नोव्हेंबरला देशाची राजधानी दिल्ली येथील लाल किल्ल्यासमोर झालेला रासायनिक बाँबस्फोट यांची जुळवणी साहजिक झाली. फरीदाबादमधून तब्बल २ सहस्र ९०० किलो अमोनियम नायट्रेट आणि २ सहस्र ५६३ किलो स्फोटके अन् कर्णावतीमधूनही स्फोटक साहित्य जप्त होणे आणि अंतिमतः या सर्वांचा जैश-ए-महंमद या आतंकवादी संघटनेशी संबंध निघणे, हा सर्व 'ऑपरेशन सिंदूर'चा सूड आहे, हे ओघाने समोर येत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने जैश-ए-महंमदला लक्ष्य केले होते. डॉ. मुजम्मिल याच्या घरातील शस्त्रसाठ्यात चिनी पिस्तुले मिळाली आहेत. आतंकवाद्यांना चीनसह अन्य देशांचे साहाय्य आहे, याचा हा आणखी एक पुरावा आहे. ते 'एन्क्रिप्टेड चॅनल'द्वारे (केवळ प्राप्तकर्त्यालाच माहिती कळण्याचे माध्यम) संवाद साधत होते. अहमद सय्यद हा एरंडाच्या बियांपासून 'रासिन' नावाचे अत्यंत विषारी विष निर्माण करत होता. हे सर्व आधुनिक वैद्य समाजसेवेच्या नावाखाली काम करत होते. शस्त्रपुरवठा, निधी पुरवठा आणि जिहादी विचारसरणी पसरवणे या सर्वच गोष्टी हे पांढरपेशे आधुनिक वैद्य करत होते. 'बेरोजगारी तरुणांना आतंकवादाकडे वळवते', असे म्हणणाऱ्या निधर्म्यांना ही सणसणीत थोबाडीत मारल्यासारखी गोष्ट आहे. 'आपल्या आजूबाजूला असणारी धर्मांध व्यक्ती घुसखोर आहे का? तिचे वागणे संशयास्पद आहे का? याविषयी सतत जागरूक राहून पहाणे किंबहुना त्यांच्याकडे संशयाने पहाणे, हे आवश्यक का आहे?', हे आतंकवादी संघटनेच्या 'स्लिपर सेल'चे (स्थानिक साहाय्यकांचे) प्रचंड जाळे पाहिले की, लक्षात येते. भारतीय नागरिकांनीही अत्यंत सतर्क राहून सुरक्षायंत्रणांना साहाय्य करणे आवश्यक आहे; त्याविना भारतमातेच्या शरीरभर पसरलेले हे 'स्लिपर सेल'चे विष संपवणे कठीण आहे. तज्ञ पोलीस आणि लष्करी अधिकारी यांच्या मते शासकीय यंत्रणा ९० टक्के घटनांमध्ये आतंकवादी घटना होण्यापूर्वीच आतंकवाद्यांचे डाव उद्ध्वस्त करत आहेत. आपल्या गुप्तचर यंत्रणांसह विविध यंत्रणांचे हे यश नाकारून चालणार नाही; परंतु आक्रमणांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याने आता परत त्रुटी आणि आत्मपरीक्षण यांकडे जाण्याची वेळ येत आहे. काँग्रेस सरकारच्या काळातील भारतावरील विविध आक्रमणे आणि बाँबस्फोट यांचा विचार करता या घटनेत ज्या गतीने चक्रे फिरली अन् सर्व यंत्रणांच्या समन्वयातून ज्या गतीने मुळाकडे जाण्याचा प्रयत्न होत आहे, तो चांगलाच आहे. तंत्रज्ञानही पुढे गेले असल्याने त्याचीही साथ मिळाली; परंतु हे सर्व करतांना माध्यमांनी त्यांचे दायित्वही लक्षात घेतले पाहिजे. काही माध्यमे ते घेतही होती; परंतु या आणीबाणीच्या काळात अधिकाऱ्यांच्या मागे लागून त्यांच्या प्रतिक्रिया घेण्याचाही भाग होत होता; ज्या वेळी पीडितांचे जीव वाचवणे त्यांचे प्राधान्य होते. अशा प्रकारचे मोठे आक्रमण देशावर होते, तेव्हा एकाच वेळी अनेक आघाड्यांवर आणि तेही तातडीने अन् तेवढेच विचारपूर्वक काम चालू करावे लागते. त्यात पीडितांना रुग्णालयात पाठवणे, पुरावे गोळा करणाऱ्या विविध यंत्रणा कार्यरत करणे, त्यासाठी परिसर बंद करणे, अग्नीशमन यंत्रणा चालू करणे, प्रत्यक्षदर्शी पुरावे गोळा करणे, त्याच वेळी विविध ठिकाणी गस्त वाढवणे, सीसीटीव्ही पडताळणे, जे पुरावे मिळत आहेत, त्यांच्या मागेमागे जाऊन मुळाशी जाण्याच्या कृती कार्यान्वित करणे, त्यामध्ये विविध यंत्रणांचा योग्य समन्वय साधणे, माध्यमे आणि नागरिक यांना दिलासा देणे, अन्य कुठे अशा प्रकारे आक्रमणाची शक्यता नाही ना? ते पडताळणे, अशा एका ना अनेक गोष्टी या अंतर्गत येतात. या साऱ्याच गोष्टी या घटनेच्या २ घंट्यांत कार्यान्वित झाल्याने त्याची फलनिष्पत्तीही चांगली मिळत गेली. विशेष म्हणजे गृहमंत्री अमित शहा स्वतः काही वेळात तातडीने घटनास्थळी आल्याने 'शासनाने ही गोष्ट अत्यंत गांभीर्याने घेतली आहे', याची निश्चिती जनतेला झाली. 'शासन अपराध्यांना शिक्षा करील', हा विश्वास जनतेला वाटणे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. मोदी शासनाने आतापर्यंत आतंकवाद्यांचा घेतलेला प्रतिशोध पहाता या घटनेनंतरही शासन काही ना काही प्रतिशोध नक्की घेईल, याची निश्चिती जनतेला आहे; परंतु 'आता हा मारामारीचा खेळ किती दिवस चालू ठेवायचा आहे ?', हा प्रश्नही सूज्ञ आणि देशप्रेमी जनतेला पडला आहे. जिहाद्यांच्या प्रत्येक आक्रमणात काहींचे मृत्यू झाल्यावर त्यांना त्याच्या दुप्पट-तिप्पट शिक्षा द्यायची; परत काही दिवसांनी त्यांनी वेगळ्या स्वरूपाचे आक्रमण करण्याचे धाडस करायचे, असेच चालू आहे. गुरुदासपूर, पठाणकोट, उरी, जम्मूतील सैन्य छावणी, अमरनाथ, पुलवामा आणि आता देहली, ही आक्रमणांची मालिका काही संपण्याचे नाव घेत नाही. ज्या ध्येयाने सरकारने नक्षलवाद संपवण्याच्या स्थितीत आणून ठेवला आहे, त्याच ध्येयाने आता भारतातील अंतर्बाह्य आतंकवादी आक्रमणे संपूर्णपणे संपवण्याचा पण केला पाहिजे; नाहीतर 'झिरो टॉलरन्स' (शून्य सहनशक्ती), 'देश की जनता सुरक्षित है' (देशाची जनता सुरक्षित आहे) या सगळ्या वल्गना ठरू शकतात. भारत सर्व दृष्टीने अधिकाधिक सक्षम होत असतांना आणि दुसरीकडे पाक अधिकाधिक भिकेकंगाल होत असतांना अशा प्रकारचे आक्रमण होणे, हे खेदजनक आहे. यापुढेही अधिक तीव्रतेने सूड घेतला, तरी पाकरूपी श्वानाचे शेपूट कधीही सरळ होऊ शकत नाही. आता कायमस्वरूपी पर्यायांचा वापर करण्याकडेच भारताने पावले उचलली पाहिजेत, असे तज्ञांसमवेत सामान्य नागरिकांनाही वाटते. किती दिवस ही आतंकवादी आक्रमणे सहन करायची ? आणि किती दिवस 'स्ट्राईक' अन् 'ऑपरेशन' करत रहायचे? आतार्यंत आपण सहस्रो सैनिक आणि लक्षावधी नागरिक यांना या अतिरेक्यामुळे गमावले आहे. त्यामुळे जनतेनी सावध झाले पाहिजे.

# रामेश्वर (रूई), जि. लातूर येथे साकारले विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन

डॉ. एस. एन. पठाण, महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च शिक्षण संचालक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू, तर अखिल भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे (ख.उ.उ.ठ. न्यू दिल्ली) उपाध्यक्ष व एक ज्येष्ठ शिक्षणतज्ञ म्हणून साऱ्या या महाराष्टाला सुपरिचित आहेत.

समाजात सामाजिक सलोखा रहावा व ज्ञानेश्वर माऊलींचा 'आता विश्वात्मक देवे' हा संदेश जगामध्ये जावा म्हणून गेली अनेक वर्षे ते विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या बरोबर 'सांप्रदायिक सद्भावाच्या' कार्यात सतत अग्रेसर आहेत व यावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत, विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी रामेश्वर (रुई) जि. लातूर येथे 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन साकारले असून त्यावर प्रकाश टाकणारा हा त्यांचा लेख.

सर्व जगात एकच धर्म असावा म्हणजे धार्मिक संघर्ष होणार नाही, असे काही विचारवंतांना वाटते. त्यामुळे सर्व धर्मांतील सारभूत अंश घेऊन नव्या धर्माची उभारणी करावी, असेही त्यांना वाटते. अकबराच्या काळात त्याने कुराण, हिंदूंचे काही धर्मग्रंथ व बायबल यांतून तत्त्वे घेऊन मदिन-ए-इलाहीफ (दैवी धर्म) या आपल्या नव्या धर्माची स्थापना केली, परंतू अकबराचा हा प्रयत्न निष्फळ ठरला. अकबरांनी प्रज्वलीत केलेली सांप्रदायिक सदभावाची ज्योत आजही कित्येक जणांना तेजाळत राहिलेली आहे. प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असेच एक व्यक्तिमत्व त्यांचे जीवनच सांप्रदायिक सदभावनेच्या विचाराने सतत उजळून निघत आहे.


### डॉ. कराडः युनेस्को अध्यासनाचे मानकरी

विश्वशांती केंद (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे आणि याची स्थापनाच एम.आय.टी. पुणे या संस्थेत झाली. जगात शांतीचे संवर्धन करण्याचे अध्यासन युनेस्कोच्या माध्यमातून या केंद्राला मिळाले. प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड या अध्यासनाचे प्रमुख. आळंदी-देहू या तीर्थक्षेत्री घाट उभारणीचे काम सुरू करून त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात केली. त्याचबरोबर विश्वशांती केंद्रात सर्व धर्मांचा तुलनात्मक ( उेरींरींर्ळींश ठशश्रळसळेप डींीवळशी) अभ्यास सुरू केला. आपल्या धर्माभिमानाच्या भिंतीची उंची काही प्रमाणात कमी करून पलीकडे पाहिले. तर तिकडे आपल्या धर्मासारखीच मूलतत्त्वे असणारा दुसरा सुंदर धर्म आहे, हे त्यांच्या लक्षात आले. माणसाने आपल्या जीवनातील धार्मिक, अध्यात्मिक प्रवृत्तीचा उपयोग सांप्रदायिक सदभाव व त्याद्वारे राष्ट्रात शांती कायम नांदण्याच्या दृष्टीने केला पाहिजे, हे त्यांना उमगले. मग वरवर हंदुत्ववादी दिसणाऱ्या प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना सांप्रदायिक सदभावनेच्या विचाराने पूर्ण पछाडून टाकले. प्रत्येक धर्म, पंथ, जात आणि त्या सर्व माणसांत त्यांना प्रेमाचा सुगंध सापडला. त्यातूनच रामेश्वर (रूई), जि. लातूर येथे साकारले विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन





### विश्वशांती केंद्रः सांप्रदायिक सदभावनेचे मंदिर



रामेश्वर (रूई), ता. जि. लातूर हे भारतातील इतर खेडयांप्रमाणे लहानसे एक खेडे. १५०० लोकवस्तीचे गाव. गावातील शेती मांजरा धरणाच्या ओलिताखाली असल्यामुळे एक सुखी, संपन्न गाव. याच गावात दादाराव कराड यांचे वारकरी कुटुंब. याच कुटुंबात प्रा. डॉ. विश्वनाथ कराड लहानाचे मोठे झाले. आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर एम.ई. मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त करून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे एक विद्यार्थिप्रिय व उत्तम प्राध्यापक म्हणून नावलौकिक मिळविला. कै. वसंतदादा पाटील यांच्या विचाराने प्रेरित होऊन १९८३ साली त्यांनी माईर्स एम.आय.टी.या अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापन केली. पुढे संस्था वाढविली. त्यासाठी खस्ता खाल्ल्या. संस्था नावारूपाला आली व विश्वशांती केंद्र (आळंदी), पुणे या नावाने एक-गोंडस पुष्प या संस्थेवर बहरले. केंद्राच्या वतीने अनेक धर्मपरिषदांचे आयोजन केले व त्यातून सांप्रदायिक सदभावनेच्या विचार अधिक बळकट झाला. डॉ. कराड सरांनी हा विचार आपल्या जन्मगावी प्रत्यक्षात रूजवून तेथे आज विश्वधर्मी मानवतातीर्थाची उभारणी केली आहे.

### हिंदू-मुस्लीम द्वेषातून प्रार्थनास्थळे उदध्वस्त

रामेश्वर (रूई ) या गावी हिंदू, मुस्लीम, बौद्ध जाती-जमातीचे लोक गुण्यागोविंदाने नांदतात. असे म्हणतात, २७५ वर्षांपूर्वी या गावातील श्रीराम मंदिर पेशवाई व निजामाच्या लढाईत उदध्वस्त झाले. त्या मंदिराच्या काही भग्न शिळा अजूनही त्या गावात आहेत. त्याचा राग म्हणून १९४८ साली निजाम रझाकार खालसा झाल्यानंतर त्या काळात आसपासच्या गावांतील हिंदू लोकांनी रामेश्वर (रूई ) ची जामा मस्जीद व ह. जैनुद्दीन बाबांचा दर्गाही उदध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. या वेळी या गावातील एक प्रगतिशील शेतकरी राष्ट्रधर्मपूजक कै. श्री. दादाराव कराड यांनी फार महत्वाची भूमिका बजावली. धर्म व जातीच्या द्वेषापायी गावातील प्रार्थनास्थळे भग्न होत असताना श्री. दादाराव कराड यांनी मात्र आपल्या हृदयातील मानवतेची ज्योत सतत तेवत ठेवली. हिंदू-मुस्लिमांमध्ये भेद न करता गावात सांप्रदायिक सदभावाचे वातावरण जोपासले. लहानग्या विश्वनाथाला त्याचे संस्कार दिले.

### साकारले मानवतातीर्थ

आपले पूज्य वडील श्री. दादाराव कराड यांच्या निधनानंतर प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी सर्व जातिधर्मातील लोकांना बरोबर घेऊन पुन्हा त्याच आपल्या जन्मगावी रामेश्वर (रूई ) येथे एका सुंदर श्रीराम मंदिराची, जामा मशिदीची आणि दर्ग्याची नव्याने उभारणी केली. या मंदिर व मशिदीच्या स्थापनेमध्ये हिंदू-मुस्लीमांनी सहभाग घेतला व आपले आर्थिक योगदान दिले. गावातील हिंदू लोकांनी हजरत जैनुद्दीन चिश्ती यांचा दर्गा बांधून दिला; तर मुस्लिमांनी श्रीराम मंदिराच्या उभारणीसाठी देणग्या दिल्या. श्रीराम मंदिरातील मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि दर्गा व मशिदीचा लोकार्पण सोहळा एकाच दिवशी झाला. त्या दिवशी गावातील सर्व हिंदू-मुस्लिमांनी आपल्या घरांवर गुढ्या उभारून व घरांपुढे रांगोळया काढून आनंद साजरा केला. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी आपल्या कार्यातून सिद्व केले की, धर्म आणि जातीच्या नावे निर्माण होणारी प्रार्थनामंदिरे तेव्हाच मानवतातीर्थ होतील, जेव्हा सर्व जातिधर्माचे लोक एकमेकांच्या धर्माचा आदर करून ती प्रेमाने बांधतील. रामेश्वर (रूई) गावी आल्यानंतर, या खेडयातील ही प्रार्थनास्थळे पाहिल्यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या त्या प्रसिद्व भजनाच्या ओळी मी गुणगुणायला लागतो.

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे
दे वरचि असा दे
हे सर्वधर्म संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे
नांदोत सुखे गरीब-अमीर एक मतांनी,
मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र्य सुखा या सकलामाजी वसू दे,
दे वरचि असा दे १

### बुद्व जयंतीची मिरवणूक म्हणजे विश्वव्यापी भारतीय संस्कृतीचे दर्शनच

रामेश्वर (रूई), ता. जि. लातूर या आपल्या गावी हिंदू-मस्लिम ऐक्याची मंदिर-मशीद-दर्गा आणि श्रीराम-रहीम मानवता सेतू ही आध्यात्मिक स्थळे साकारल्यानंतर प्रा. डॉ. कराड यांचे लक्ष त्यांच्या गावातील मागासवर्गीय बंधूकडे गेले नाही, तर मग नवलच म्हणावे लागले असते. खरे म्हणजे यापूर्वीच गावात डॉ. कराड सरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची उभारणी केली होती. कै. अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने स्मारक करावे, असे त्यांच्या मनात होते; परंतु ज्या तथागत गौतम बुद्वांची ओळखच जगामध्ये मशांतिदूतफ म्हणून आहे किंवा भारत या महान देशाला जगामध्ये आज केवळ गौतम बुद्व आणि महात्मा गांधींचा देश म्हणून संबोधण्यात येते, त्या तथागत गौतम बुद्वांचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभे करावे, असा विचार प्रा. डॉ. कराड सरांच्या मनात आला आणि सर कामाला लागले.

रामेश्वर (रूई), ता. जि. लातूर येथील मबुद्व विहार या भव्य बुद्व विहाराचा लोकार्पण सोहळा मबुद्व पौर्णिमा म्हणजेच बुधवार, दि. १० मे २०१७ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.रामेश्वर (रूई) येथील मागासवर्गीय बंधूंना प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी एकत्र आणून गावात निर्माण केले आहे - एक सुंदर बुद्व विहार तथागत भगवान गौतम बुद्व आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमा (मूर्ती) असलेला जपानचा पॅगोडाच्या धर्तीवर उभारण्यात आलेला हा बुद्व विहार म्हणजे एक उत्तम शिल्पकलेचा नमुनाच म्हणावा लागेल. हा बुद्व विहार या गावात सर्वधर्मसमभावाची साक्ष देतो. तथागतफ भगवान गौतम बुद्व विहार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती विश्वशांती भवन मध्ये बौद्व धर्माचा इतिहास व पंचशील तत्वे अत्यंत सुबक व देखण्या पद्वतीने उत्तम तैलचित्राच्या माध्यमातून लावण्यात आलेली आहेत. बुद्व विहाराच्या बरोबर पाठीमागील बाजूस विहाराच्या केंद्रस्थानी असलेला सुंदर-तेजस्वी बोधीवृक्ष व त्याला प्रदक्षिणा घालण्यासाठी उभारलेला गोलाकार सेतू आणि विहारासमोर लावलेल्या वेगवेगळया ध्वनी - नाद करण्याऱ्या मोठया घंटा या बुद्व विहाराचे वैशिष्टय आहे. अशा पद्वतीचे भव्य पॅगोडा शिल्पकलेत बांधलेले बुद्व विहार कदाचित महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात ही अत्यंत नावीन्यपूर्ण ठरले आहे. ही सर्च प्रार्थनास्थळे सर्व भारतीयानांच प्रेरणादायी आहेत. सर्वच धर्मातील लोकांचा व त्यांच्या प्रार्थनास्थळांचा येथील गावकऱ्यांना अत्यंत अभिमान वाटतो.



**डॉ. एस. एन. पठाण**
माजी कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, माजी उपाध्यक्ष, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, भारत सरकार, नवी दिल्ली, सल्लागार, विश्वशांती केंद्र (आळंदी), पुणे, भारत.

### बुद्व जयंतीचा ऐतिहासिक सोहळा

दि. ३० एप्रिल २०१८ रोजी रामेश्वर (रूई) , ता. जि. लातूर येथील बुद्व जयंतीची मिरवणूक ऐतिहासिक होती. या ऐतिहासिक प्रसंगाचे दिव्य दर्शन सर्व मान्यवरांना व जनतेला घडले. प्रमुख पाह?णे होते लॉर्ड बुद्वा, नागपूर दूरदर्शन वाहिनीचे प्रमुख श्री. भैय्याजी खैरकर, प्रख्यात साहित्यिक डॉ. रतनलाल सोनग्रा, प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, भदन्त डॉ. महाथेरो, या मान्यवरांच्या उपस्थितीत हा बुद्व जयंतीचा कार्यक्रम पार पडला. मलाही या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मी केले.

सोमवार, दि. ३० एप्रिल २०१८ रोजी सकाळी १०.०० >> पान ५

# मानवतातीर्थ भवन: सांस्कृतिक एकता आणि मानवजातीच्या उत्कर्षासाठी निर्मित अद्भुत वास्तू

'स्वातंत्र्याचे रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे' हा लोकमान्य बाणा लाखो विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारे, 'माझी भारतमाता २१ व्या शतकात विश्वगुरू होईल' ही स्वामी विवेकानंदांची संकल्पना मूर्त स्वरूपात आणणारे, प्रखर राष्ट्रभक्त दादाराव कराड यांच्या जडणघडणीत तयार झालेले रत्न आणि आदिशक्तीरूप प्रयागअक्कांच्या संस्कारात वाढलेले व्यक्तित्व अर्थात आंतरराष्ट्रीय शिक्षणतज्ञ विश्र्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड सर यांच्या स्वप्नपूर्तीचा सोहळा म्हणजे विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाचा भव्य उदघाटन समारंभ हा दिनांक १४ नोव्हेंबर रोजी यज्ञभूमी रामेश्वर, लातूर येथे संपन्न होत आहे. मानवी कल्याणासाठी विश्र्वगीत असणारे पसायदान देणारे तत्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांचा वसा पुढे चालवत मानवकल्याणासाठी शिक्षण, ऊर्जा आणि दिशा देणारे हे मंगलकारक मानवतातीर्थ भवन ही अदभुत वास्तू एक ऊर्जादायी केंद्र आहे. संपूर्ण भारतात एकमेवद्वितीय असणारी ही वास्तू म्हणजे मानवी इतिहासातील सुवर्णजडीत इतिहासाचे पान ठरेल यात शंकाच नाही.

भारतीय संस्कृतीत पृथ्वी ही फक्त मातीची बनलेली वस्तू नव्हे, तर माता आहे. ती आम्हाला आहार देते, आश्रय देते आणि जीवनाचे मूलभूत तत्त्व शिकवते. संस्कृतातील एक प्राचीन श्लोक म्हणतो:

भूः शक्तिः पृथिवी देवी सर्वभूताश्रयणं सदा। म्हणजेच, भूमी ही शक्ती आहे, पृथ्वी ही देवी आहे, जी सदैव सर्व प्राण्यांचे आश्रयस्थान आहे.

वरील श्लोक आपल्याला स्मरण करून देतो, की पृथ्वी ही केवळ भौतिक अस्तित्व नव्हे, तर आध्यात्मिक आणि सांस्कृतिक आधार आहे. आजच्या वैश्विक जगात, जिथे ध्रुवीकरण आणि संघर्ष वाढत आहेत, अशा वेळी 'मानवतातीर्थ भवन' सारखे प्रार्थनागृह हे एक नवीन आशादायी भविष्य उदयास येत आहे. हे भवन केवळ जागतिक सभागृह नसून, सांस्कृतिक वारसा जपणारे, एकता प्रस्थापित करणारे आणि मानवजातीच्या उत्कर्षासाठी समर्पित तीर्थ आहे. हे भवन भारतीय संस्कृतीच्या मूल्यांवर आधारित असून, आधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणस्नेही संकल्पनेचा वापर करून बांधले गेले आहे. भूमी ही माता, तिचे दूध अमृत। असे सांगणारी आमची संस्कृती,



शिकवते की मानवाने तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी. मानवतातीर्थ भवन हे पवित्र यज्ञभूमी रामेश्वरच्या भूमीवर उभे राहून, मानवतेच्या अमृतासारख्या मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करते.

### भारतीय संस्कृती आणि वैश्विक मानवतातीर्थाचे स्थान

भारतीय संस्कृती ही विविधतेची सुपीक भूमी आहे. येथे वेगवेगळ्या धर्म, भाषा आणि परंपरा एकत्र येऊन एक सुंदर मिलाफ साधतात. विश्वधर्मी मानवतातीर्थ, ज्याला मानवतेचे मंदिर किंवा तीर्थक्षेत्र म्हणू, हे केवळ पूजेचे स्थळ नसून, सामाजिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे. वेदांमध्ये म्हटले आहे:

**सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः।**
**मा कश्चिद् दुःखभाग्भवेत् सर्वे भवन्तु सुखिनः।।**

म्हणजेच सर्वजण सुखी होवोत, सर्वजण निरोगी होवोत। कोणीही दुःखी होऊ नये, सर्वजण सुखी होवोत। हा मंत्र मानवतेच्या सार्वत्रिक कल्याणाची प्रार्थना करतो. मानवतातीर्थ भवन हे असेच एक आधुनिक तीर्थ आहे, जिथे अध्यात्मिक परंपरेच्या माध्यमातून सर्व मानवजातीला एकत्र आणले जाते. पारंपरिक मंदिरांप्रमाणे हे भवन वेद, उपनिषद आणि पुराणांच्या शिकवणींवर आधारित आहे, पण त्यात नवीन कल्पना जोडल्या गेल्या आहेत. हे भवन व्यक्तींच्या आंतरिक उर्जेवर चालते, पवित्र जीवनग्रंथाचे मार्गदर्शन देते आणि मनाच्या संवादाने जगभरातील लोकांना जोडते. हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे, ज्यात 'वसुधैव कुटुंबकम' (संपूर्ण जग एक कुटुंब आहे) हे तत्त्व मूर्त रूप धारण करते.

मानवतातीर्थ भवन हे समविचारी व्यक्तींच्या टाळ्यांसारखे आहे, ज्यात विविध हात एकत्र येऊन सामूहिक ध्वनी नाद निर्माण करतात. भारतीय संस्कृतीत तीर्थक्षेत्रे ही केवळ धार्मिक नसून, ज्ञानाचे केंद्र असतात. काशी, उज्जैन किंवा तिरुपतीसारख्या ठिकाणी लाखो लोक एकत्र येतात, जिथे जात, धर्म किंवा वर्गाची सीमा नसते. मानवतातीर्थ भवन हे २१व्या शतकातील असे तीर्थ आहे, जे पर्यावरणीय संकट आणि सामाजिक विभाजनाच्या काळात एकतेची धग निर्माण करते.

### मानवतातीर्थ भवन: एक नवकल्पना तीर्थ

मानवतातीर्थ भवन हे पारंपरिक विश्वधर्मी प्रार्थनागृहाचे आधुनिक रूप आहे. ते एका विशाल परिसरात वसलेले आहे, ज्यात मध्यभागी एक भव्य मंडप आहे, जो मानवतेच्या मंत्रांनी गूंजतो. भवनाचे निर्माण वास्तुशास्त्रावर आधारित आहे, ज्यात पंचमहाभूतांचा (पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश) समावेश आहे.

माता भूमिः पितृ दिवः सर्वं विश्र्वं तपोमयम्। माता भूमी, पिता आकाश, संपूर्ण विश्व तपश्चर्या आहे।

हे भवन केवळ प्रार्थनेसाठी नसून, सांस्कृतिक कार्यशाळा, ध्यान सत्रे आणि आंतरराष्ट्रीय संमेलनांसाठीही आहे. कल्पना अशी आहे की, अध्यात्मिक परंपरेच्या माध्यमातून मानवतेच्या मूलभूत मूल्यांचा प्रसार करणे. उदाहरणार्थ, येथे 'अहिंसा परमो धर्मः' (अहिंसा हाच सर्वोच्च धर्म आहे) या महात्मा गांधींच्या आणि तथागत गौतम बुद्धाच्या शिकवणीवर आधारित कार्यक्रम चालतील जे पर्यावरण संरक्षणाशी जोडलेले असतील.

भवनाची नवीनता ही त्याच्या 'मानवता तीर्थ यात्रा' या संकल्पनेत आहे. यात विश्वशांती दर्शन चॅनेलच्या उपक्रमातून जगभरातील लोक घरी बसून सहभागी होऊ शकतात. हे COVID-19 नंतरच्या जगासाठी उपयुक्त आहे, जिथे प्रत्यक्ष उपस्थिती प्रत्येकवेळी शक्य नसते. भारतीय संस्कृतीमध्ये, तीर्थयात्रा ही आत्मशुद्धीचे साधन आहे; येथे ती मानवशुद्धीचे साधन होते. भवनात विविध धर्मांच्या शिकवणुकीचे प्रतिनिधित्व आहे, ज्यामुळे ते एक बहुधार्मिक केंद्र होते.

### एकतेचे प्रतीक

सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक बंध आजच्या काळात, जिथे राजकीय आणि धार्मिक संघर्ष वाढत आहेत, मानवतातीर्थ भवन एकतेचे प्रतीक आहे. भारतीय संस्कृतीत एकता ही विविधतेच्या फुलांसारखी आहे. ऋग्वेदातील वचन याची खात्री देतात.

एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति। अर्थात सत्य एक आहे, अनेक विद्वान ते विविध अन्वयार्थाने कथन करतात । या श्लोकातच सर्व धर्मांच्या एकतेचे प्रतिपादन आहे. भवनात हिंदू मूर्तींसोबतच, बौद्ध, जैन आणि शिख प्रतीकांचे भव्य प्रदर्शन आहे, जे सांस्कृतिक संवादाला प्रोत्साहन देते. भगवद्गीतेच्या श्लोकावरून प्रेरित असे हे भवन आहे आणि या भवनाचे ध्येयच सांगते - सर्वांच्या हितासाठी, सर्वांच्या सुखासाठी!

या उत्तुंग भवनाच्या माध्यमातून सांस्कृतिक वारसा जपला जाईल. येथे पारंपरिक नृत्य, संगीत आणि कथा सत्रे चालतील, ज्यात युवकांना सहभागी करून घेतले जाईल. हे भारतीय परंपरेचे मूलभूत तत्त्व गुरुकुल तत्वज्ञावर आधारित आहे, जिथे ज्ञान पिढयानपिढया हस्तांतरित होते. हीच आहे नवकल्पना आधारित अनुवाद प्रणाली, ज्यामुळे विविध भाषिक लोक सहज संवाद साधू शकतात. हे भवन केवळ भारतासाठी नसून, आंतरराष्ट्रीय अभ्यासकांसाठीही खुले आहे, ज्यामुळे भारतीय वैश्विक संस्कृतीचा प्रसार जगभरात होईल, हे निश्चित.

### मानवजातीच्या उत्कर्षासाठी भूमिका

मानवतातीर्थ भवन मानवजातीच्या उत्कर्षासाठी समर्पित आहे. ते पर्यावरण, शिक्षण आणि शांततेच्या क्षेत्रात कार्य करते. पृथिव्यै स्वाहा पृथिव्यै स्वधा। अर्थात पृथ्वीला अर्पण, पृथ्वीला नमस्कार ।

या भव्य भवनात 'भूमी संरक्षण' उपक्रम असतील, ज्यात वृक्षारोपण आणि शाश्वत शेती शिकवली जाईल. हे भवन म्हणजे एक मानसिक आरोग्य केंद्र आहे, जिथे योग आणि ध्यानाद्वारे तणाव कमी केला जातो. हे WHO च्या मानसिक आरोग्य दिशानिर्देशांशी सुसंगत आहे. तसेच णछएडउज च्या ध्येयधोरणांची अंमलबजावणी करते.

शिक्षणाच्या बाबतीत, भवनात मानवता अभ्यासक्रम आहे, जो शाळा विद्यार्थ्यांसाठी विशेषरूपाने स्पर्धापरीक्षेच्या रूपात निर्माण केलेला आहे. यात भारतीय इतिहास, परंपरा आणि आधुनिक विज्ञान यांचा समावेश आहे. हे उत्कर्षाचे साधन आहे, कारण ते युवकांना जबाबदारीपूर्ण नागरिक बनवते. आंतरराष्ट्रीय स्तरावर, भवन णछ च्या शांतता, न्याय आणि पर्यावरण या शाश्वत विकास ध्येयांशी (SDGs) जोडलेले आहे.

आव्हाने आणि भविष्यकीदृष्ट्या कोणत्याही नवकल्पनेला आव्हाने येतात. पण भारतीय परंपरेमध्ये सत्यमेव जयते हे तत्त्व आहे. अंधार असेल तर दीप प्रज्वलित करा या तत्वानुसार हे भवन हे असे दीपक आहे, जे अज्ञान, अहंकार रुपी अंधार मिटवते.

मानवतातीर्थ भवन ही केवळ इमारत नसून, एका स्वप्नाचे मूर्त रूप आहे. ते पृथ्वी, मानवता, भारतीय संस्कृती आणि अभिव्यक्ती च्या माध्यमातून एकता आणि उत्कर्षाचे मार्गदर्शन करते.

हे भवन त्या मानव धर्माचे प्रतीक आहे. चला, या तीर्थाकडे वाटचाल करूया, जेणेकरून मानवजात एकत्र येऊन उज्ज्वल भविष्य घडवेल.

सहनावातु, सह नौ भुनक्तु । सहवीर्य करवावंहै ।
तेजस्विनीनावधीत्मस्तु, मा विद्विषावहै ।। शान्तिः शान्तिः शान्तिः।।

**डॉ. रत्नदीप रा. जोशी**



कुलसचिव, माईर्स, एमआयटी शैक्षणिक संस्था समूह, पुणे, भारत.

# एकटेपणा घातक ?

## वाढू शकतो हृदय आणि रक्तवाहिन्यांचा धोका, तज्ञांचं मत

माणूस हा समाजशिल प्राणी असला तरी अनेकजण असे आहेत जे एकटं राहाणं पसंत करतात. तर काहींना परिस्थितीनुसार एकटं राहावं लागतं. मागल्या दोन वर्षातील कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेकांवर कोरोनाची लागण झाल्याने एकटं राहाण्याची पाळी आली होती. मात्र तज्ज्ञांनी केलेल्या एका अभ्यासातून असं निदर्शनास आलंय की, माणसाच्या जीवनातील एकटेपणा म्हणजे हृदय संबंधित रोगांना आमंत्रण. एकटेपणामुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधीच्या (उरीवर्ळेींरीर्ली्श्ररी ऱ्ळीशरीशी) काही समस्या उद्भवू शकतात असे मत अमेरिकन हार्ट असोसिएशनने मांडले आहे. अशा वेळी सामाजिक संवाद फार महत्वाचा ठरतो. तसेच एचए (-ाशीळलरप क्शरीीं -ीी-ळळरींळेप) च्या रिपोर्टमध्ये असेही सांगितल्या गेले आहे की, सामाजिक दूरी आणि एकटेपणा या दोन्हींचा शरीरातील रक्तवाहिन्यांवर व मेंदूवर घातक परिणाम होतो. अमेरिकन हार्ट असोसिएशनने केलेल्या स्टडीनुसार ३० टक्के हृदयाचे विकार वाढण्यात एकटेपणा जबाबदार आहे. तसेच गेल्या ४० वर्षाच्या संशोधनातून एकटेपणाचे परिणाम आरोग्यावर झाल्याचे दिसून येते. मृत्यूदरामध्ये वाढ होण्यासही एकटेपणा कारणीभूत असल्याचे कळते. आणि एकटेपणाचे प्रमाण पुरुषांमध्ये जास्त असल्याचे अभ्यासात दिसून आले आहे. सामाजिक संवादाच्या अभावाने मुले डिप्रेशनच्या अभावी जातात आणि नतर त्यांना लठ्ठपणा, हाय ब्लड प्रेशर आणि ग्लुकोजचे प्रमाण वाढण्यासारख्या समस्या उद्भवतात. सोशल आयसोलेशन आणि



एकटेपणाचं प्रमाण १८ ते २२ वयोगतील वर्गात कॉमन दिसून येतं. तसेच वयाची पासष्टी गाठणाऱ्यांतही एकटेपणा दिसून येतो. असे लोक स्वत:ला आयसोलेट करून घेतात की यांना खरंच एकटेपणा वाटतो यावर अजूनही अभ्यास सुरू आहे.

# सोनार समाजात नवी दिशा आणि दिखाऊपणा टाळून केले लग्न

सोलापूर -- ( वसंत पोतदार कडून ) येथील सोनार समाजातील सेवा निवृत्त नायब तहसीलदार श्री.विजयकुमार उद्धवराव भास्करे यांचे चि. प्रीतम व श्री. अनील चंद्रकांत धर्माधिकारी यांची कन्या चि. सौं. कां. वैष्णवी यांचा शुभ विवाह दि. १३ नोव्हेंबर रोजी होटगी रोड वरील कै. सौं. शांताबाई किल्लेदार मंगल कार्यालयात संपन्न झाला. आजकाल हुंड्याशिवाय कितीही गरीबअसला तरी लग्न होत नाही. तथापी हुंडा देणे घेणे कायद्याने बंदी घातली असली तरी खोट्या प्रतिष्ट्ये पायी हुंडा दिला व घेतला जातो. पण कांही तरुण हुंडा न घेता विवाह करणेसाठी पुढे येत आहेत. सोलापूर येथील भास्करे व धर्माधिकारी परिवारातील वर वधू नी हुंडा न घेता, देता आपल्या विवाहाच्या रेशीम गाठी बांधल्या. वधू वर दोघेही पदवीधर असून त्यांनी हुंडा विरोधी चळवळीला बळ देत एक चांगला आदर्श सोनार समाजापूढे घालून दिला आहे.या परिवाराचे कौतुक होत आहे.

चि. प्रीतम भास्करे महाविद्यालयीन जीवनात त्यांनी हुंडा बंदी वर काम केले आहे. हुंडा बंदी कायदा असूनही कृती मध्ये नसल्याने एक मोठी खंत होती. समाजात आजही हुंडा देणे, घेणे प्रतिष्ठा मानली जाते. मुलीच्या लग्नाला जास्तीचा खर्च केल्याने आई वडील कर्ज बाजारी होऊन आयुष्यभर कर्ज फेडत असतात. तरीही हुंड्याची कू प्रथा सुरूच आहे. चि. प्रीतम भास्करे महाविद्यालयीन जीवनात हुंडा न घेता विवाह करण्याचा निर्धार सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी आपला निर्णय वडील श्री. विजयकुमार भास्करे यांना सांगितले.

वडिलांनी देखील त्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला. हा विवाह सोहळा दोन्ही कुटुंबातील सदस्यांनी हुंड्याला फाटा देत करण्याचा निर्णय घेतला.

पदवीधर असलेल्या वधू वरांनी हुंडा विरोधी चळवळीला बळ देत हुंडा न घेता विवाह करत लग्नाच्या रेशीम गाठी बांधल्या. सोनार फेडरेशन चे जिल्हाध्यक्ष श्री प्रमोदभैय्या वेदपाठक म्हणाले की, चि. प्रीतम च्या निर्णयामुळे समाजात एक सकारात्मक संदेश जातो की, लग्नासारख्या पवित्र नात्या साठी



कोणत्याही प्रकारच्या पैशाची, हुंड्याची आवश्यकता नाही. चि. प्रीतम चा हुंडा न घेणे हा एक आदर्शवादी आणि महत्वाचा निर्णय आहे.

यातून भास्करे कुटुंबियांची स्वाभिमानाचे आणि चांगल्या भविष्याचे प्रतीक दिसून येते अशी प्रतिक्रिया संत नरहरी मंदिर समितीचे जेष्ठ सल्लागार श्री. दीपकनाना वेदपाठक यांनी दिली.खोट्या प्रतिष्ठा साठी वराने वधूच्या वडिलांकडून हुंडा घेऊ नये. समाज सुधारण्यासाठी हुंडा न घेता लग्न करण्यासाठी नवरदेवानी समोर आले पाहिजे असा सल्ला पांचाळ सोनार समाज संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. पदनकुमार दीक्षित मोहोळ यांनी दिला. तर सुशिक्षित सुसंस्कृत पिढीने हुंडा न घेता विवाह करण्यासाठी पूढे येणे आवश्यक आहे अशी प्रतिक्रिया

सोनार समाज संस्थेचे उपाध्यक्ष श्री. विजयकुमार पोतदार यांनी दिली आणि पुढील महिन्यात होणाऱ्या सोनार समाजाच्या सामाजिक बांधिलकी पुरस्कार प्रदान सोहोळ्यात चि. प्रीतम भास्करे याना प्रेरणा व्यक्तिमत्व पुरस्कार प्रदान करून सन्मानीत करणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष श्री.वसंत पोतदार यांनी सांगितले.

या विवाह सोहळ्यास, सर्वश्री दत्तगुरु वेदपाठक, सतीश पोतदार, प्रकाशराव पोतदार, जितेंद्र वेदपाठक, सतीश वेदपाठक, डॉ. दीपक पोतदार, निलेशजी धाराशिवकर, श्यामदादा पोतदार, कीर्तनकार ह. भ. प. धनंजयजी वेदपाठक काक्रंबा, हेमंतकुमार महामुनी, इंजि. सारंग महामुनी पंढरपूर, सतीश सोनार जेऊर अक्कलकोट, प्रशांत वैरागकर धाराशिव, प्रदीप पोतदार, मोहन दीक्षित, संजय पोतदार, अविनाश महामुनी पूणे, सुधीर पंडित सर करमाळा, अनील पोतदार अकलूज, श्रीकांत क्षीरसागर उपळाई, गजानन वाघूलकर सतारा तसेच करमाळा, जेऊर, केम, बोरामणी, अक्कलकोट, येथील नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आदी मंडळी उपस्थित होते.

# स्फोटके आणि अमोनियम नायट्रेटचा वापर

दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ झालेल्या स्फोटासंदर्भात तपास यंत्रणांनी मोठ्या प्रमाणात अमोनियम नायट्रेट जप्त केले आहे. विशेषतः फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठाशी संबंधित आरोपी डॉक्टरांच्या भाड्याच्या खोल्यांमधून जप्त केलेल्या २ हजार ९०० किलो स्फोटकांमध्ये ३६० किलो अमोनियम नायट्रेट होते. अमोनियम नायट्रेट हे स्फोट घडविण्यासाठी वापरले जाते. मात्र, त्याचा स्फोटासाठी थेट वापर होत नाही.

कार्यप्रणाली

अमोनियम नायट्रेट हे स्फोटासाठी आवश्यक असलेला ऑक्सिजन पुरवते. सामान्य परिस्थितीत ते स्थिर असते. डिझेलसारखा ज्वलनशील पदार्थ त्यामध्ये मिसळला तर अमोनियम नायट्रेट ज्वलनशील पदार्थासाठी ऑक्सिडायझर म्हणून काम करते. स्फोटाची क्रिया अमोनियम नायट्रेटला इंधन तेलासारख्या ज्वलनशील पदार्थात मिसळून त्याला डेटोनेटरने प्रेरणा दिल्यावर ते एक अत्यंत प्रभावी स्फोटक बनते. स्फोट झाल्यावर अमोनियम नायट्रेट आणि इंधन तेल यांच्यात अत्यंत जलद रासायनिक प्रतिक्रिया होते. या अभिक्रियेतून नायट्रोजन, कार्बन डायऑक्साइड आणि पाण्याची वाफ यांसारखे गरम वायू मोठ्या प्रमाणात आणि अतिशय कमी वेळात बाहेर पडतात. वायूंचा हा प्रचंड आणि त्वरित विस्तार एक शक्तिशाली शॉक वेव्ह निर्माण करतो, ज्यामुळे विध्वंसक स्फोट होतो.

तीव्रता एक किलो इंधन मिश्रित अमोनियम नायट्रेटची





स्फोटक क्षमता साधारणपणे ०.४ ते ०.८ टीएनटी इतकी असते. इंधन मिश्रित अमोनियम नायट्रेटचा स्फोट ३ हजार २०० मीटर प्रति सेकंद इतका असतो. स्फोटाची ही गती प्रचंड ऊर्जा आणि पॉवरफुल शॉक वेव्ह तयार करण्यासाठी पुरेशी असते, त्यामुळे मोठ्या प्रमाणात संरचनात्मक नुकसान होते.

वापर कोठे होतो? खत : शेतीत नायट्रोजनयुक्त खत म्हणून याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो.

औद्योगिक स्फोटके : खाणकाम, उत्खनन आणि स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये खडक फोडण्यासाठी अमोनियम नायट्रेटचा वापर केला जातो, कारण ते तुलनेने स्वस्त, सुरक्षित आणि हाताळण्यास सोपे असते.अवैध स्फोटक उपकरणे : त्याची उपलब्धता आणि प्रभावीपणा यामुळे त्याचा वापर सुधारित स्फोटक उपकरणे तयार करण्यासाठी दहशतवादी हल्ल्यांमध्ये केला गेला आहे.

साठवणूक आणि सुरक्षितता

लोकवस्तीच्या भागांमध्ये अमोनियम नायट्रेटच्या साठवणुकीवर सक्त मनाई आहे. गोदामांसाठी सुरक्षिततेचे अंतर पाळणे बंधनकारक आहे. गोदामांची रचना आणि बांधकाम विटा किंवा दगडांनी मजबूत असावे आणि अनधिकृत प्रवेश टाळण्यासाठी किमान दोन मीटर उंचीची संरक्षक भिंत असावी. मोठ्या साठवणुकीसाठी (उदा. ३० मेट्रिक टनापेक्षा जास्त) गोदामांना संरक्षणात्मक बांधकामांपासून ४५ ते ९० मीटर पर्यंत सुरक्षित अंतर ठेवावे लागते. साठवणुकीच्या आणि हाताळणीच्या ठिकाणी अग्निशमन सुविधा असणे आवश्यक आहे.

निर्बंध कोणते?

देशात अमोनियम नायट्रेटची निर्मिती, साठवणूक, विक्री आणि वाहतुकीवर अत्यंत कडक निर्बंध आहेत. याचा गैरवापर टाळण्यासाठी विशेषत: स्फोटकांसाठी वापर होऊ नये, यासाठी अमोनियम नायट्रेट नियमन १८८४ च्या कायद्यांतर्गत आणि अमोनियम नायट्रेट अधिनियम २०१२ द्वारे त्याचे नियमन केले जाते.

स्फोटक म्हणून वर्गीकरण : ज्या मिश्रणात वजनानुसार ४५ टक्क्यांपेक्षा जास्त अमोनियम नायट्रेट असते, त्याला स्फोटक मानले जाते. या नियमातून खतांना वगळले आहे, कारण त्यामधून अमोनियम नायट्रेट काढता येत नाही.

परवाना आणि नियंत्रण : अमोनियम नायट्रेटची निर्मिती, विक्रीसाठी ताबा किंवा वापर करण्यासाठी केंद्र सरकारचा परवाना घेणे अनिवार्य आहे. पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटना यावर नियंत्रण ठेवते आणि परवाने जारी करते.

वाहतुकीवरील निर्बंध : अमोनियम नायट्रेटची वाहतूक इतर स्फोटक पदार्थ, ज्वलनशील पदार्थ, तेल, वायू किंवा कार्बनयुक्त पदार्थांबरोबर करण्यास मनाई आहे. वाहतूक करणार्या व्यक्तीची पोलिस पडताळणी करावी लागते.

आयात-निर्यात : आयात-निर्यात केवळ परवान्याअंतर्गत आणि केंद्रीय सरकारने अधिसूचित केलेल्या विशिष्ट बंदरांवरून केली जाते. आयात केलेले अमोनियम नायट्रेट बंदराच्या परिसरात ठेवता येत नाही; ते ५०० मीटर दूर असलेल्या साठवणूक केंद्रात त्वरित हालवावे लागते.

## मुरुमे टाळण्यासाठी 'हे' करा

### डॉक्टर टीप्स

'मुरुमं..' हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर 'ॲक्ने' अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते. जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. त्यामुळे आपल्या 'मुरुमां'वरील उपचारांना सुरुवात करण्यापूर्वी या समस्येशी जोडलेल्या गैरसमजांपासून स्वत:ला दूर नेणे आवश्यक आहे.



'मुरुमां'शी संबंधित काही सर्वसाधारण मिथके आणि या गोष्टी कपोलकल्पित का आहेत, यामागची कारणे पुढीलप्रमाणे –

मिथक : चेहरा जास्त वेळा धुतल्याने 'मुरुमां'चे शुद्धीकरण होते वास्तव: मुरुमं ही धुळीमुळे उद्भवत नाहीत. त्वचेवरील छिद्रे धूळ बसल्याने बाहेरून बंद होतात, त्यामुळे मुरुमे उद्भवतात.

**(क्रमशः)....**

## विनोद




गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?

शिष्य : असत्यवादी.

गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?

शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## संदेश

Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## सुविचार



जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.


**-सर्वेंटिस**

### संस्कृत सुभाषित

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: । दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

### उभे शब्द

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार


### आडवे उत्तर

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

### उभे उत्तर

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



अमेरिकेतील सॅन्झेन येथे एनबीएच्या नियमित हंगामाच्या सामन्यात सॅन्झेनटो किंग्ज आणि डेन्व्हर नगेट्समधील भाग घेताना खेळाडू.

# भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पहिला सामना आजपासून

**भारत आणि दक्षिण आफ्रिका या तुल्यबळांतील दोन सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेला आज, शुक्रवारपासून प्रारंभ होणार असून या वेळी दोन्ही संघांतील दर्जेदार फिरकी आणि वेगवान गोलंदाजांसमोर फलंदाजांचा कस लागणे अपेक्षित आहे.**

**वृत्तसंस्था, कोलकाता:**भारत आणि दक्षिण आफ्रिका या तुल्यबळांतील दोन सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेला आज, शुक्रवारपासून प्रारंभ होणार असून या वेळी दोन्ही संघांतील दर्जेदार फिरकी आणि वेगवान गोलंदाजांसमोर फलंदाजांचा कस लागणे अपेक्षित आहे.

गेल्याच महिन्यात शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारताने मायदेशात वेस्ट इंडिजविरुद्ध २-० असे निर्भेळ यश संपादन केले होते. मात्र, आता कसोटीतील जगज्जेत्या दक्षिण आफ्रिकेकडून भारतीय संघाला कडवी झुंज मिळणे अपेक्षित आहे. गेल्या वर्षी भारताला न्यूझीलंडविरुद्ध ०-३ अशा मानहानीकारक पराभवाचा सामोरे जावे लागले होते. त्या वेळी एजाझ पटेल आणि मिचेल सँटनर हे डावखुरे फिरकीपटू, तसेच ऑफ-स्पिनर ग्लेन फिलिप्स यांचा सामना करताना भारतीय फलंदाज सपशेल अपयशी ठरले होते. या तिघांनी मिळून ३६ गडी बाद करण्याची किमया साधली होती. दक्षिण आफ्रिकेच्या संघातही केशव महाराज व सेनुरन मुथुसामी असे दोन डावखुरे फिरकीपटू आणि सायमन हार्मरच्या रूपात ऑफ-स्पिन गोलंदाज आहे. त्यामुळे आता त्यांच्याविरुद्ध भारतीय फलंदाज कशी कामगिरी करतात, यावर या मालिकेचा निकाल अवलंबून असू शकेल.

दक्षिण आफ्रिकेचा संघ ऐतिहासिकदृष्ट्या जागतिक दर्जाच्या वेगवान गोलंदाजांसाठी ओळखला जातो. मात्र, सध्याच्या घडीला त्यांच्याकडे तीन उत्कृष्ट फिरकी गोलंदाजही आहेत. दक्षिण आफ्रिकेने अलीकडेच पाकिस्तानातील कसोटी मालिका १-१ अशी बरोबरी सोडवली होती. त्यात महाराज, मुथुसामी आणि हार्मर यांनी मिळून ३५ गडी बाद केले होते. याउलट पाकिस्तानच्या नोमान अली, साजिद खान आणि सलमान आघा या फिरकी गोलंदाजांना मिळून २१ बळीच मिळवता आले होते. त्यामुळे आता दक्षिण आफ्रिकेचे फिरकी त्रिकुट दमदार कामगिरी सुरू ठेवताना भारतीय फलंदाजांसमोरही आव्हान उपस्थित करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करतील.

**वेगवान गोलंदाजांनाही मदत**

ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीबाबत गेल्या काही दिवसांपासून बरीच चर्चा केली जात आहे. बंगाल क्रिकेट संघटनेचा अध्यक्ष सौरव गांगुलीने सामन्यासाठीची खेळपट्टी पूर्णपणे फिरकीला अनुकूल नसेल असे म्हटले आहे. या खेळपट्टीवर काही प्रमाणात गवत ठेवण्यात आले असून विशेषत: पहिले दोन दिवस वेगवान गोलंदाजांना मदत मिळणे अपेक्षित आहे. भारताकडे जसप्रीत बुमरा आणि मोहम्मद सिराज, तर आफ्रिकेकडे कगिसो रबाडा आणि मार्को यान्सन असे अप्रतिम वेगवान गोलंदाज आहेत. त्यामुळे तेसुद्धा या सामन्यात मोठा प्रभाव पाडू शकतील.

**साई सुदर्शनवर लक्ष**

सलामीवीर केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल, तसेच मधल्या फळीत कर्णधार शुभमन गिल, ऋषभ पंत, ध्रुव जुरेल आणि रवींद्र जडेजा यांनी अलीकडच्या काळात चमकदार कामगिरी केली आहे. गेल्या दोन कसोटी मालिकांत प्रशिक्षक गौतम गंभीरसह संघ व्यवस्थापन आणि निवड समितीने तिसऱ्या क्रमांकावर साई सुदर्शनला संधी दिली आहे. मात्र, साईला अद्याप विश्वास सार्थ ठरवता आलेला नाही. त्याने पाच कसोटी सामन्यांच्या नऊ डावांत केवळ २७३ धावा केल्या आहेत. यात अवघ्या दोन अर्धशतकांचा समावेश आहे. त्यामुळे आता त्याच्यावर दडपण वाढत आहे. अष्टपैलू जडेजाचे स्थान निश्चित आहे. अन्य फिरकीपटूंच्या स्थानांसाठी कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्यापैकी कोणाला पसंती मिळणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**मधल्या फळीत युवकांवर भिस्त**

दक्षिण आफ्रिकेसाठी रायन रिकल्टन आणि एडीन मार्करम सलामीवीराची भूमिका बजावतील. मधल्या फळीत दक्षिण आफ्रिकेची भिस्त युवा फलंदाजांवर असेल. ट्रिस्टन स्टब्स, डेवाल्ड ब्रेव्हिस आणि टोनी डी झोर्झी हे फलंदाज प्रथमच भारतात कसोटी सामना खेळणार आहे. यावेळी त्यांचा भारताच्या गुणवान फिरकीपटूंविरुद्ध कस लागू शकेल. कर्णधार टेम्बा बव्हुमाच्या पुनरागमनामुळे दक्षिण आफ्रिकेच्या संघाला बळकटी मिळाली आहे. बव्हुमाने अलीकडेच दक्षिण आफ्रिका 'अ' संघाकडून खेळताना अर्धशतक साकारले होते. त्यामुळे आता त्याला बाद करणे भारतासाठी निर्णायक ठरू शकेल.



### दोन्ही संघातील खेळाडूंची याची

**भारत :** शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत (यष्टिरक्षक), यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमरा, आकाश दीप.

**दक्षिण आफ्रिका :** टेम्बा बव्हुमा (कर्णधार), एडीन मार्करम, रायन रिकल्टन, ट्रिस्टन स्टब्स, काएल व्हेरेने (यष्टिरक्षक), डेवाल्ड ब्रेव्हिस, झुबेर हमझा, टोनी डी झोर्झी, कॉर्बिन बॉश, वियान मुल्डर, मार्को यान्सन, कगिसो रबाडा, केशव महाराज, सेनुरन मुथुसामी, सायमन हार्मर.

**वेळ**
सकाळी
९.३० वा.
**थेट प्रक्षेपण**
स्टार स्पोर्ट्स
१, २, १ हिंदी,
जिओहॉटस्टार
ॲप.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### वेस्ट इंडिजचा एकतर्फी पराभव करत कीवींनी जिंकली मालिका

डुनेडिन-पाचव्या आणि शेवटच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात न्यूझीलंड क्रिकेट संघानं वेस्ट इंडिजचा ८ विकेट्सनं पराभव केला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना, कॅरेबियन संघाचा फलंदाजीचा क्रम जेकब डफीसमोर कोसळला आणि संपूर्ण संघ केवळ १४० धावांवर गारद झाला. डफीनं ४ विकेट्स घेत कहर केला. प्रत्युत्तरात कीवींनी १४१ धावांचं लक्ष्य १५.४ षटकांत फक्त २ विकेट्स गमावून सहज गाठलं. टिम रॉबिन्सननं शानदार फलंदाजी केली, त्यानं केवळ २४ चेंडूत ४५ धावा केल्या, तर डेव्हॉन कॉनवं ४७ धावांवर नाबाद राहिला. या विजयासह न्यूझीलंडनं पाच सामन्यांची टी-२० मालिका ३-१ अशी जिंकली. मालिकेतील पहिला सामना वेस्ट इंडिजनं सात धावांनी जिंकला. यानंतर न्यूझीलंडनं दुसरा सामना तीन धावांनी आणि तिसरा सामना नऊ धावांनी जिंकला. चौथा सामना सोमवारी पावसामुळं रद्द करण्यात आला होता.रॉबिन्सन आणि कॉनवेच्या खेळीनं सहज विजय : १४१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, डेव्हॉन कॉनवेसह दमदार सुरुवात केली.

***

### शार्दुल ठाकूर रोहित शर्मासोबत मैदानावर उतरणार

मुंबई-भारताचा ऑल राऊंडर क्रिकेटर शार्दूल ठाकूर आयपीएलचा पुढील हंगाम मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे. मुंबई इंडियन्सनं लखनौ सुपर जायंटस सोबत ट्रेड डील करत शार्दूल ठाकूरला संघात घेतलं आहे. आता शार्दूल ठाकूर रोहित शर्माच्या साथीने मुंबई इंडियन्सच्या साथीनं खेळताना पाहायला मिळेल. शार्दूल ठाकूर गेल्या वर्षीच्या मेगा ऑक्शनमध्ये अनसोल्ड राहिला होता. मात्र, लखनौ सुपर जायंटसने मोहसीन खान जखमी झाल्याने त्याच्या जागी संघात घेतले होते.मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंटस सोबत ट्रेड कील करत संघात सामील करुन घेतले. मुंबई इंडियन्सने शार्दूल ठाकूरसाठी २ कोटी रुपये मोजले आहेत. शार्दूल ठाकूरला गेल्या वर्षी लखनौने २ कोटी रुपयांमध्ये संघात सहभागी करुन घेतले होते. तितकीच रक्कम यावर्षी मुंबई इंडियन्सकडून त्याला दिली जाणार आहे. लखनौ सुपर जायंटस सध्या विदेशी वेगवान गोलंदाज ऑलराऊंडरच्या शोधात आहेत.

***

### आयपीएल लिलावाआधीच मुंबई इंडियन्समध्ये मोठे उलटफेर!

मुंबइ-आयपीएल २०२६ साठी सगळ्या १० टीमनी त्यांच्या तयारीला सुरूवात केली आहे, पण मुंबई इंडियन्सने या सगळ्यात आघाडी घेतली आहे. १५ नोव्हेंबरला सर्व टीमना त्यांनी रिलीज आणि रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे, पण त्याआधीच मुंबईने दोन खेळाडू ट्रेड केले आहेत. मुंबईने लखनऊकडून शार्दुल ठाकूरला २ कोटी रुपयांना तर गुजरातकडून शरफेन रदरफोर्डला २.६ कोटी रुपयांना टीममध्ये घेतलं आहे. तर दुसरीकडे मुंबईने अर्जुन तेंडुलकरला लखनऊला दिलं आहे. अर्जुनला मुंबईने लिलावात ३० लाख रुपयांमध्ये विकत घेतलं होतं. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबईचा मागच्या मोसमात क्वालिफायर-२ मध्ये पराभव झाला होता. सर्वाधिक ५ वेळा आयपीएल चॅम्पियन असलेल्या मुंबईला २०२० नंतर एकही ट्रॉफी जिंकता आलेली नाही.

## प्रदर्शनी क्रिकेट सामन्यात मुख्यालय संघाचा रोमहर्षक विजय

अमरावती-श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडासंकुलात सुरु असलेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रदर्शनी क्रिकेट सामन्यात बुधवारी (दि. १२) मुंबई मुख्यालय संघाने १२ षटकांमध्ये ९६ धावांचे आव्हान देत नागपूर प्रादेशिक संघाला ९० धावांवर रोखले व शेवटच्या षटकापर्यंत रंगतदार झालेल्या या सामन्यात सहा धावांनी विजय मिळवला.महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सामना सुरू झाला. मुंबई मुख्यालयाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी स्वीकारली व खराब चेंडूवर फटकेबाजी सुरू केली आणि १२ षटकांमध्ये ६ बाद ९६ धावा केल्या. यात कार्यकारी संचालक श्री. प्रसाद रेशमे (१३ धावा), सहायक महाव्यवस्थापक श्री. वैभव थोरात (१८ धावा) व उपमहाव्यवस्थापक प्रमोद खुळे (१७ धावा) यांनी धावसंख्येला आकार दिला. तर कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके यांनीही साथ दिली. मात्र नागपूर प्रादेशिक संघाने १८ धावा अतिरिक्त दिल्याने मुख्यालय संघाची सामन्यावरील पकड मजबूत झाली.नागपूर प्रादेशिक संघाने आव्हान स्विकारून सावध पवित्रा घेत फलंदाजी सुरू केली. यात अधीक्षक अभियंता संजय वाकडे (१८ धावा) तर कार्यकारी अभियंता श्री. प्रफुल लांडे (१५ धावा) यांनी चांगली भागिदारी करीत लक्ष्याकडे वाटचाल सुरू केली. त्यानंतर कार्यकारी अभियंता श्री. पुरूषोत्तम चव्हाण व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मधुसूदन मराठे यांनी प्रत्येकी ११ धावा केल्या. अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अशोक साळुंके यांनी ७ धावांचे योगदान देत संघाला विजयाकडे नेले. त्यांना चंद्रपूरचे मुख्य अभियंता श्री. हरिष गजबे व अधीक्षक अभियंता श्री. प्रविण दरोली यांनी साथ दिली. मात्र शेवटच्या षटकामध्ये विजयासाठी ११ धावांची गरज होती. मुख्यालय संघाकडून प्रमोद खुळे यांनी अचूक गोलंदाजी केली व इतरांनी उत्कृष्ट क्षेत्ररक्षण केले. त्यामुळे नागपूर प्रादेशिक संघ शेवटच्या षटकात केवळ पाच धावा करू शकला आणि मुख्यालय संघाने सहा धावांनी विजय मिळवला.मुख्यालय संघामध्ये महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे, कार्यकारी अभियंता श्री. सुनील पावरा व माणिक गवळी, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. बजरंग सुर्यवंशी, उपविधी अधिकारी श्री. सुमेध कोलते तर नागपूर प्रादेशिक संघात मुख्य अभियंता श्री सुहास रंगारी (गोंदिया), श्री. दिलीप दोडके (नागपूर) व श्री. राजेश नाईक (अकोला) यांच्यासह सहायक महाव्यवस्थापक श्री. रूपेश देशमुख आदींचा समावेश होता.

## लक्ष्य सेनची जपान मास्टर्सच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक

नवी दिल्ली-भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन याने कुममातो मास्टर्स जपान बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. त्याने गुरुवारी (दि. १३) झालेल्या सामन्यात सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहचा सरळ फेरीमध्ये पराभव करून आपले स्थान पक्के केले. मात्र, दुसरीकडे भारताचा अनुभवी खेळाडू एच.एस. प्रणॉय याचा प्रवास दुसऱ्या फेरीतच संपुष्टात आला. प्रणॉयला ४६ मिनिटे चाललेल्या या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात डेन्मार्कच्या रासमस गेम्केकडून १८-२१, १५-२१ अशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले.सन २०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा कांस्यपदक विजेता असलेल्या लक्ष्य सेनने जगातील २० व्या क्रमांकाच्या तेहवर ३९ मिनिटांत २१-१३, २१-११ असा सहज विजय मिळवला. संपूर्ण सामन्यात लक्ष्यचेच वर्चस्व पाहायला मिळाले. त्याने सिंगापूरच्या खेळाडूला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही. आता उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेनची लढत जागतिक क्रमवारीत १५व्या स्थानी असलेल्या सिंगापूरच्या माजी विश्वविजेत्या लोह कीन यू याच्याशी होणार आहे.

## वानखेडेवरून मारलेला सिक्स, आता अरबी समुद्रात जाणार... मुंबईने गुजरातकडून खेचून आणला नवा पोलार्ड

मुंबई-आयपीएल २०२६ साठीची ट्रेड डील १५ नोव्हेंबरपर्यंत करायची आहे. १५ नोव्हेंबरला संध्याकाळी ५ वाजता प्रत्येक टीमला त्यांनी रिटेन, रिलीज आणि ट्रेड केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे, पण याच्या ४८ तास आधीच मुंबईने धमाका केला आहे. आधी शार्दुल ठाकूरला लखनऊकडून घेतल्यानंतर आता मुंबईने वेस्ट इंडिजच्या धमाकेदार फिनिशरलाही गुजरातकडून घेतलं आहे.गुजरात टायटन्सचा आक्रमक फिनिशर शरफेन रदरफोर्डला मुंबईने २.६ कोटी रुपयांमध्ये ट्रेड करून विकत घेतलं आहे. वेस्ट इंडिजचा डावखुरा आक्रमक बॅटर असलेल्या शरफेन रदरफोर्डचं मुंबई इंडियन्समध्ये कमबॅक झालं आहे, याआधी रदरफोर्ड २०२० साली ट्रॉफी जिंकलेल्या मुंबई इंडियन्सचा भाग होता. फिनिशरशिवाय शरफेन रदरफोर्ड मीडियम फास्ट बॉलिंगही करतो.आयपीएलच्या मागच्या मोसमात मुंबई इंडियन्सकडे नमन धीरशिवाय कोणताही फिनिशर नव्हता, त्यामुळे ही कमी पूर्ण करण्यासाठी मुंबईने रदरफोर्डची टीममध्ये निवड केली आहे. मागच्या काही काळापासून मुंबई कायरन पोलार्डचा पर्याय शोधत आहे, त्यामुळे रदरफोर्ड पोलार्डची जागा भरून काढणार का? हे येणाऱ्या मोसमात स्पष्ट होईल. शरफेन रदरफोर्डने आतापर्यंत २३ आयपीएल सामन्यांमध्ये १३७.३८ चा स्ट्राईक रेटने ३९७ रन केले आहेत. तर वेस्ट इंडिजकडून खेळताना रदरफोर्डने १३७.३९ चा स्ट्राईक रेट आणि १८.३८ च्या सरासरीने ४४ सामन्यांमध्ये ५८८ रन केले. याशिवाय त्याने आयपीएलमध्ये ६ इनिंगमध्ये ८.६३ च्या इकोनॉमी रेटने बॉलिंग करत एक विकेटही मिळवली आहे.



चीनमधील शेन्झेन येथे १५ व्या चिनी राष्ट्रीय खेळांमध्ये ७८ किलो वजनी गटाच्या महिला ज्युडो फायनलमध्ये भाग घेताना महिला खेळाडू.

# ऋतुराजचं वादळी शतक अनब भारताचा द. आफ्रिका अ संघावर दणदणीत विजय



**नवी दिल्ली:** ऋतुराज गायकवाडच्या दमदार शतकाच्या जोरावर भारतीय अ संघाने दक्षिण आफ्रिका अ संघाचा पहिल्या वनडे सामन्यात मोठा पराभव केला. भारत अ आणि दक्षिण आफ्रिका अ यांच्यात पहिला अनऑफिशियल वनडे सामना खेळला गेला. या सामन्यात कर्णधार तिलक वर्माच्या नेतृत्त्वाखालील भारत अ संघाने दक्षिण आफ्रिका अ संघाचा पराभव केला. ऋतुराज गायकवाडच्या वादळी शतकी खेळीच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिका अ संघाला ४ विकेट्सने पराभूत केलं. प्रथम फलंदाजी करताना आफ्रिकन संघाने २८५ धावांचा डोंगर उभारला, पण भारताच्या फलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला, ज्यात ऋतुराजची सर्वात महत्त्वाची भूमिका होती.

राजकोटमध्ये खेळवल्या गेलेल्या या सामन्याची नाणेफेक दक्षिण आफ्रिका अ संघाने जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यासह संघाने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद २८५ धावा केल्या आहेत. तर प्रत्युत्तरात भारतीय संघाने ऋतुराज गायकवाडच्या शतकी खेळीच्या जोरावर ४९.३ षटकांत ६ विकेट्स गमावत २९० धावा करत विजय मिळवला.

ऋतुराज गायकवाडने १२९ चेंडूत १२ चौकारांसह ११७ धावांची उत्कृष्ट खेळी केली आणि भारत अ संघाला विजयाच्या उंबरठ्यावर आणून ठेवलं. दक्षिण आफ्रिका अ संघाच्या गोलंदाजांची धुलाई करत ऋतुराजने शतकी खेळी केली. ऋतुराज सध्या उत्कृष्ट फॉर्मात असून त्याने बूची बाबू स्पर्धा, दुलीप ट्रॉफी, रणजी ट्रॉफी आणि आता भारत अ संघाकडून खेळताना शतकं झळकावली आहेत.

ऋतुराज गायकवाडसह अभिषेक शर्माने पहिल्या विकेटसाठी ६४ धावांची शानदार भागीदारी रचली. अभिषेकने २५ चेंडूत ४ चौकार व एका षटकारासह ३१ धावा केल्या. कर्णधार तिलक वर्माने ३९ धावांचे योगदान दिले. इशान किशनने २१ चेंडूत १७ धावा केल्या. त्यानंतर नितीश कुमार रेड्डीने ३७ धावांची तर निशांत सिंधुनेही महत्त्वपूर्ण २९ धावांची खेळी केली. तर हर्षित राणाने एक षटकार लगावत संघाचा विजय निश्चित केला.

दक्षिण आफ्रिकेची सुरूवात खूप खराब झाली. आघाडीच्या फळीतील फलंदाज अपयशी ठरले, तर डेलानो पॉटगीटरने ९० धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला, यामध्ये त्याने १० चौकार आणि एक षटकार लगावला. ब्योर्न फोर्टुइनने ५९ धावांचे योगदान दिले, तर डायन फॉरेस्टरनेही ७७ धावा केल्या. या तिन्ही खेळाडूंच्या अर्धशतकांमुळे दक्षिण आफ्रिकेने २८५ धावांचा सन्मानजनक आकडा गाठला.

भारतीय अ संघाकडून अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. अर्शदीपने १० षटकांत ५९ धावा दिल्या, तर हर्षितने १० षटकांत ४९ धावा दिल्या. त्याच्याशिवाय प्रसिध कृष्णा, निशांत संधू, रियान पराग आणि नितीश रेड्डी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## दत्तक जनजागृती सप्ताहानिमित्त उदगीर येथे विविध उपक्रमांचे आयोजन, संघी निकेतन शिक्षण संस्था वडगाव संचलित शिशुगृहामार्फत जनजागृती कार्यक्रम

**उदगीर/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे यंदाही शासनाच्या वतीने ''दत्तक जनजागृती महिना २०२५'' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार संघी निकेतन शिक्षण संस्था, वडगाव (द.ग.) संचलित शिशुगृह, एस.टी. कॉलनी, नळेगाव रोड, उदगीर (जि. लातूर) या संस्थेत १४ ते २० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राष्ट्रीय दत्तक जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

या कालावधीत संभाव्य दत्तक पालकांसाठी मार्गदर्शन शिबिरे, जनजागृती कार्यक्रम तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०२२ अंतर्गत दत्तक प्रक्रियेची अंमलबजावणी आणि संबंधित कायदेशीर माहितीही नागरिकांना दिली जाणार आहे.

संस्था प्रमुखांनी सर्व नागरिकांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

संघी निकेतन शिक्षण संस्था, वडगाव द्वारे संचलित शिशुगृह उदगीर ही संस्था गेली ३० वर्षांपासून अनाथ, बेवारस आणि विशेष गरजा असलेल्या बालकांचे मोफत संगोपन करीत असून, त्यांचे कायदेशीर पुनर्वसन नियमानुसार करण्यात येते. संस्थेच्या या कार्यामुळे उदगीर परिसरात बालसंगोपन आणि पुनर्वसन क्षेत्रात प्रशंसनीय कार्य होत आहे.

## नंदिनी पडिले यांना सावित्रीबाई फुले नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार जाहीर : विविध संस्थांकडून अभिनंदन : १६ नोव्हेंबरला पुण्यात होणार पुरस्कार वितरण



**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या योग व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य करत असलेल्या नंदिनी पडिले यांना अत्यंत प्रतिष्ठित मानला जाणारा सावित्रीबाई फुले महाराष्ट्र नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. १६ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार नंदिनी पडिले यांना प्रदान करण्यात येणार आहे.



नंदिनी पडिले या गेल्या आठ-दहा वर्षांपासून लातूरमध्ये सनराईज् योगा स्टुडिओच्या माध्यमातून स्त्रियांच्या आरोग्याच्या प्रश्नावर, समुपदेशनच्या माध्यमातून कार्य करत आहेत. यासाठी त्यांनी सनराईज योगा स्टुडिओची निर्मिती केलेली आहे. तसेच सनराईज बहुउद्देशीय सामाजिक संस्थेद्वारे गोरगरीब शालेय महाविद्यालयीन मुलींच्या आरोग्यासाठी शिक्षणासाठी आर्थिक सहकार्य करत असतात. नुकत्याच आशियाई बेसबॉल चॅम्पियनशिपसाठी लातूर येथील एका गरीब विद्यार्थिनीची निवड झाली होती.

स्वतःचा वाढदिवस साजरा न करता त्यांनी त्या विद्यार्थिनीला आर्थिक मदत केलेली आहे. आत्तापर्यंत शहरातील तीन हजार महिलांना त्यांनी योगा केंद्र केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले आहे. तसेच देवराईच्या पर्यावरण कार्यासाठी त्या अनेक वर्षापासून कार्य करत आहेत. मराठवाड्यातील २०० दुर्मिळ वनस्पतींची माहिती त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संकलित करून सिने अभिनेते सयाजी शिंदे यांना सुपूर्द केली आहे. या कार्याबद्दल कवी लेखक अरविंद जगताप यांनी त्यांचा सन्मान केलेला आहे. त्यांना सावित्रीबाई फुले महाराष्ट्र नारीशक्ती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. सामाजिक कार्यात अनेक संस्थांसोबत त्या कार्यरत असल्यामुळे सह्याद्री देवराई, सनराईज योगा स्टुडिओ, हरीती वाचक चळवळ, दक्ष नागरिक, नारी प्रबोधन मंच, लातूर वृक्ष चळवळ, योग आणि फिटनेस सेंटरसह अनेक संस्थांनी देखील त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

# आज विश्वधर्मी रामेश्वर (रूई) येथे मान्यवरांच्या उपस्थितीत

# 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना'चा लोकार्पण सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन' या वास्तूचा लोकर्पण सोहळा शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.१५ वा. लातूर जिल्ह्यातील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रूई) या ठिकाणी होणार आहे. अशी माहिती या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी दिली.

या सोहळ्याला सन्माननीय प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांचे सुपूत्र व माजी खासदार सुनील शास्त्री असतील. अध्यक्षस्थानी संत वृत्तीचे शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर असतील. प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर तसेच माजी केंद्रीय मंत्री व जम्मू काश्मीर राजघराण्याचे वारसदार डॉ.करण सिंह शुभाशीर्वाद देण्यासाठी असतील. सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना आणि पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या सोहळ्यासाठी रोमन कॅथोलिक चर्च चे माजी बिशप फादर फेलिक्स मचाडो, मौलाना आझाद नॅशनल उर्दू युनिव्हर्सिटीचे माजी कुलपती डॉ. फिरोज बख्त अहमद व अमेरिका येथील चिंतक व अभ्यासक मायकेल गनेल हे विशेष सन्माननीय पाहुणे असतील. तसेच सन्माननीय पाहुणे म्हणून भंते राहुल बोधी, महंत रामदास, योगी अमरनाथ, श्रीमती कमलाताई गवई, महाराज परमवीर सिंह, डॉ. मेहेर मास्टर मूस, डॉ. एडिसन सामराज, डॉ. प्रकाश महानवार, इझीकेल मळेकर, मौलाना अन्सारी चतुर्वेदी, डॉ. बिनी सरीन, डॉ. संजय देशमुख, डॉ.लेसन आझादी, वाहिदमियाँ चिस्ती, सौ. पुष्पाताई बोंडे, आचार्य रतनलाल सोनग्रा व सरदार मानजितसिंह खालसा हे उपस्थित म्हणून राहणार आहेत.

महाराष्ट्राच्या मराठवाड्यातील रामेश्वर (रूई) हे गांव यज्ञभूमी म्हणून परिचित आहे. याच गावातील हिंदू मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन जवळपास २७५ वर्षापूर्वी उध्वस्त केलेल्या श्रीराम मंदिराच्या जागी सुंदर अशा मकराना मार्बलमध्ये श्रीराम मंदिर व सुमारे ६३ वर्षापूर्वी उध्वस्त करण्यात आलेली जामा मस्जिद व ख्वाजा जैनुद्दिन चिश्ती दर्गा यांची पुनर्बांधणी करण्यात आली आहे. तसेच या ठिकाणी विश्वधर्मी राम रहिम मानवता सेतूची उभारणी, तथागत भगवान गौतम बुद्ध विहार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती भवनाची उभारणी करण्यात आली आहे. अशा विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक स्वरूपाच्या उपक्रमांमुळे रामेश्वर रूई खऱ्या अर्थाने मानवता तीर्थ



आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मनातील आदर्श गाव म्हणून उदयास आले आहे. याचाच पुढचा टप्पा म्हणजे विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचा लोकर्पण सोहळा आहे.

भारताची विश्वात्मक संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञानाचा अनुभव देणाऱ्या या दिव्य वास्तूच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहण्याची विनंती आमदार रमेश कराड, रामेश्वर (रूई) चे सरपंच सचिन कराड, माईर्स एमआयटीचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड, अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड, माईर्स एमआयटीचे विश्वस्त हभप तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, माईर्स एमआयटीचे विश्वस्त प्रा. प्रकाश जोशी, डॉ. विरेंद्र घैसास, राजेश कराड व समस्त विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर रूई ग्रामस्थांनी केले आहे.

## श्री मारवाडी राजस्थान विद्यालय लातूर येथे राष्ट्रीय विधी सेवा दिन उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या समान कार्यक्रमानुसार लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विधी सेवा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूर शहरातील जवळपास ११ विद्यालये व महाविद्यालयातील सुमारे २५० एनसीसी कॅडेट उपस्थित हजर होते. या शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी मार्गदर्शन केले.

समाजातील वंचित, गरीब व शोषित घटकांना मोफत व निष्पक्ष न्याय मिळावा, या हेतूने राष्ट्रीय विधी सेवा कायदा १९८७ पारीत करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी ०९ नोव्हेंबर १९९५ पासून करण्यात येत आहे. त्यामुळे म्हणून दरवर्षी ०९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय विधी सेवा दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या तीन स्तरावर वंचित, गरीब व शोषित घटकांना मोफत व निष्पक्ष न्याय देण्याचे कार्य विधी सेवा प्राधिकरणमार्फत केले जात असल्याचे श्री. गिरवलकर यांनी सांगितले. तसेच भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार व राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्वे यावर मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पी. एम. खरोसेकर, एन.सी.सी. कमांडर संतोष नवगन व यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, परकाम्य संलेख अधिनियम कलम १३८ धनादेश अनादरीत प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, कामगार तथा औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधीत प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. तसेच बँक तथा वित्तीय संस्थांची वाद दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी संधी मिळते. तसेच दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड पक्षकारांच्या आपसी संमतीने होते. लोक अदालतमध्ये प्रकरण आपसी संमतीने निकाली निघाल्यास पक्षकारांचा वेळ व पैसा वाचतो. लोक अदालतीमध्ये दोन्ही पक्षकारांच्या संमतीने प्रकरण निकाली निघालेवर न्यायालयीन शुल्क तथा कोर्ट फिस परत मिळते. त्यामुळे पक्षकार व विधीज्ञ यांनी १३ डिसेंबर २०२५ रोजीचे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय जे. भारूका, तसेच सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी केले आहे.

# डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय 'शेड्युल्ड ड्रग्ज'ची विक्री करु नका-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### * केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन पदाधिकारी यांची बैठक * व्यसनासाठी औषधांचा वापर रोखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन * युवा पिढीला व्यसनाधीन बनण्यापासून रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

**लातूर/प्रतिनिधी :** डॉक्टरांच्या चिट्टीशिवाय प्रवर्गीय औषधे अर्थात शेड्युल्ड ड्रग्जची विक्री केली जावू नये. तसेच अशा औषधे विक्रीची माहिती औषध विक्रेत्यांनी जतन करून ठेवणे आवश्यक असून लातूर जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी या नियमांचे पालन करावे. प्रवर्गीय औषधांचा वापर व्यसनासाठी केला जावू शकत असल्याने सर्वांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. आपल्या लातूर जिल्ह्यातील युवा पिढीला व्यसनाधीन बनण्यापासून रोखण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज असून केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनने यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनच्या पदाधिकारी बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक केशव राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, अन्न व औषध प्रशासनचे सहायक आयुक्त प्रमोद काकडे, बळीराम मरेवाड यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

औषधांचा नशेसाठी वापर होणे, ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे सर्व औषध विक्रेत्यांनी अतिशय संवेदनशीलपणे आणि जबाबदारीने काम करण्याची गरज आहे. लातूर जिल्ह्यातील युवा पिढीमधील व्यसनाधिनता कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत औषध विक्रेत्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रवर्गीय औषधांची विक्री डॉक्टरांच्या चिट्टीशिवाय न करण्याचा संकल्प करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

युवा पिढी अंमली पदार्थांच्या आहारी गेल्यास समाजाला दूरगामी परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून काम करायला हवे. प्रवर्गीय औषधांची विक्री करताना नियमांचे पालन न करणाऱ्या औषधे विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यासोबतच व्यसनाधिनता कमी करण्यासाठी प्रबोधनही केले जाणार आहे. लातूर शहरातील हॉस्टेल चालक, ट्युशन क्लासेसचे संचालक, महाविद्यालये यांनाही या मोहिमेत सहभागी करून घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

युवकांना व्यसनाधीन बनविण्यासाठी प्रवर्गीय औषधांचा वापर केला जात आहे. त्यामुळे डॉक्टरांच्या चिट्टीशिवाय अशी औषधे विकणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. तसेच डॉक्टरांच्या चिट्टीशिवाय अशी औषधे देण्यासाठी कोणीही दबाव टाकत असेल तर विक्रेत्यांनी त्याची माहिती पोलीस प्रशासनाला द्यावी. तसेच अशी औषधे अनधिकृतपणे विकणाऱ्यांची माहितीही प्रशासनाला द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यावेळी म्हणाले.

**जिल्हा प्रशासनाला सहकार्य करण्याचा केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनचा निर्धार !**

युवा वर्गातील व्यसनाधिनता कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन करीत असलेल्या प्रयत्नांना सर्वो तोपरी सहकार्य करण्याचा निर्धार लातूर केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला. डॉक्टरांची चिट्टी असल्याशिवाय कोणताही विक्रेता प्रवर्गीय औषधांची विक्री करणार नाही, असे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. तसेच औषध विक्रेत्यांना येणाऱ्या अडचणींची माहिती दिली.

**'से नो टू ड्रग्ज'चे फलक दर्शनी भागात लावा**

जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी आपल्या दुकानांच्या दर्शनी भागात 'से नो टू ड्रग्ज' म्हणजेच 'ड्रग्जला नाही म्हणा' या आशयाचे फलक लावून जनजागृती करावी. आपल्या भावी पिढीला अंमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

पान २ वरून...

## रामेश्वर (रुई), जि. लातूर येथे साकारले विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन

वाजता श्रीराम मंदिरात दर्शन घेऊन टाळ-मृदंगाच्या गजरात रघुपती राघव राजाराम पतित पावन सीताराम असे भजन म्हणत बुद्ध जयंतीची मिरवणूक गावातून निघाली. ज्यावेळी ही मिरवणूक तथागत गौतम बुद्ध विहार येथे आली, तेव्हा अर्थातच बुद्धम शरणम गच्छामी, धम्मम शरणम गच्छामि असा जयघोष झाला. मिरवणूक पुढे गावातील जामा मशिदीसमोरून संत गोपाळबुवा मंदिराकडे जात होती. मशिदीजवळ येताच 'ईश्वर अल्लाह तेरो नाम - सबको सन्मती दे भगवान' हे महात्मा गांधीजींचे अत्यंत आवडते भजन सर्व जण गात होते. शाळेचे विद्यार्थी अक्षरशः नाचत होते. संत गोपाळबुवा मंदिरात ही मिरवणूक पोहोचताच पुंडलिका वरदे हरी, विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकारामाचा गजर झाला.

सोनावळा नुदीवरील श्रीराम-रहीम मानवता सेतूमधून ही मिरवणूक जात असताना जणू एकीकडे इस्लाम धर्माची आजान (बांग) चे सुमधुर स्वर कानी पडत आहेत, तर त्याच वेळी ह. जैनुद्दीन चिस्ती, यांच्या दर्ग्यावरील कव्वालीचे स्वर साद घालत आहेत, असा भास होत होता. नंतर ह. जैनुद्दीन चिस्ती यांच्या दर्ग्यावर फुलांची चादर अर्पण करून विश्वशांतीसाठी समाधीवर दुऑ मागण्यात आली. या कार्यक्रमात सर्वधर्मीय मान्यवर सामील झाले होते.

रामेश्वर (रूई), येथील विश्व मानवतातीर्थ रामेश्वर (रूई ) या गावात खऱ्या अर्थाने इतिहास घडला आहे. जिथे एखादी धार्मिक मिरवणूक काढत असताना पोलिसांची मदत घ्यावी लागते, तिथे या गावातील मिरवणुकीमध्ये विविध जातिधर्मांचे लोक, विद्यार्थी, युवक-युवती सर्वधर्मीयांची भजणे म्हणत आनंदात सहभागी होताहेत, हे नवलच म्हणावे लागेल. म्हणून रामेश्वर (रूई) केवळ मानवतातीर्थ नसून, त्याला विश्वधर्मी मानवतातीर्थ असेच म्हणावे लागेल.

दि. ०६ मे, २०२५ रोजी जागतिक किर्तीचे महान संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी रामेश्वर (रूई) या गावचे नामकरण विश्वधर्मी मानवता तिर्थ असे केले. विशेष म्हणजे रामेश्वर (रूई) या गावच्या सर्व नागरिकांनी, ग्रामसभेने व ग्रामपंचायतीने एकमुखाने तसा ठराव पारित केला होता. आज संत गोपाळबुवांच्या प्रांगणात २८८ फुट लांब आणि १२६ फुट रूंद असलेले विश्वधर्मी मानवता भवन उभे राहिले आहे. जगातील सर्व प्रसिध्द शास्त्रज्ञ व संत यांची ४४ भव्य तैलचित्रे येथे प्रत्येक खांबावर लावण्यात आली आहे. हे मानवता भवन म्हणजे बांधकामाचा वेगळाच आदर्श नमुना आहे. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड सर या मानवता भवनाद्वारे साऱ्या जगाला महात्मा गांधींच्या स्वप्नातील खेडेगावाद्वारे विश्वशांतीचा, बंधुभावाचा आणि प्रेमाचा संदेश देत आहेत ते पाहून माझे तर हात जुळतात आणि तोंडातून शब्द फुटतात, धन्य ते विश्वधर्मी मानवता भवन रामेश्वर (रूई) गांव आणि धन्य ते प्रा. डॉ. विश्वनाथ कराड त्यांना माझा साष्टांग नमस्कार, दंडवत.

**मूळ लेखन : डॉ. एस. एन. पठाण**
**(माजी कुलगुरू)**

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आरोग्य जनजागृती उपक्रमांना गती देण्यासाठी आढावा बैठक

धाराशिव, दि.१२ नोव्हेंबर (जिमाका) राज्यातील विविध आरोग्य कार्यक्रम आणि योजनांचा प्रभावी प्रसार करून त्या अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात,यासाठी आरोग्य सेवा संचालक डॉ.विजय कंदेवाड यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,पुणे येथे आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीला राज्यातील सर्व जिल्ह्यांतील विस्तार व माध्यम अधिकारी (डेमो) उपस्थित होते.

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे उपसंचालक डॉ.कैलास बाविस्कर,सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार बैठकीला उपस्थित होते.यावेळी राज्यातील आरोग्य जनजागृती उपक्रम, जनसंपर्क मोहिमा तसेच माध्यमांशी प्रभावी संवाद यावर सविस्तर चर्चा झाली.

संचालक डॉ.कंदेवाड यांनी आरोग्य विभागाच्या विविध योजना आणि उपक्रम जनतेत पोहोचविण्यासाठी नावीन्यपूर्ण माध्यम धोरण आखण्याची सूचना केली.त्यांनी सांगितले की,आरोग्यविषयक माहिती जनसामान्यांना सुलभ भाषेत आणि आकर्षक पद्धतीने दिली गेल्यास त्यांचा आरोग्यविषयक जागरूकतेत मोठी भर पडेल.प्रसारमाध्यमांशी सकारात्मक आणि सातत्यपूर्ण संपर्क राखणे,तसेच आरोग्याशी संबंधित नकारात्मक किंवा गैरसमज निर्माण करणाऱ्या बातम्यांना योग्य प्रत्युत्तर देऊन तथ्य मांडणे,याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

तसेच,सर्व जिल्हा माध्यम अधिकार्यांना समाज माध्यमांचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना देत, विभागाच्या अधिकृत समाज माध्यम खात्यांवरील फॉलोअर्स वाढविण्यासाठी समन्वयित प्रयत्न करावेत,अशी सूचनाही त्यांनी केली.

आरोग्य जनजागृती हा केवळ विभागाचा कार्यक्रम नसून तो एक सामाजिक जबाबदारीचा भाग आहे. प्रत्येक अधिकाऱ्याने त्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे,अशी अपेक्षा बैठकीचा समारोप करताना डॉ.बाविस्कर यांनी व्यक्त केली.

या बैठकीत जिल्हास्तरावर राबविल्या जाणाऱ्या आरोग्यविषयक जनजागृती उपक्रमांचे अनुभव,अडचणी व यशोगाथा यांची देवाणघेवाण करण्यात आली.आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यासाठी सर्व स्तरांवर माहिती-प्रसार मोहिमा अधिक सशक्त करण्यावर भर देण्यात आला.

## जेष्ठ नागरिकांनी सुवर्ण वाचन योजनेचा लाभ घ्यावा – डॉ. मदनसिंग गोलवाल



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुवर्ण वाचन योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा जेष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा. मोबाईलमुळे इंटरनेटच्या युगात आज वाचन कमी झाले असले तरी मानवी जीवनात पुस्तकांचे महत्त्व फार महत्वाचे आहे ते कधीच कमी होणार नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम हे अजरामर व्यक्तीमत्त्व पुस्तक वाचनामुळेच घडली आहेत. तेंव्हा धाराशिवमधील जेष्ठ नागरिकांनी या योजनेच्या जास्तीत जास्त प्रमाणात लाभ घ्यावा. असे आवाहन महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख डॉ. मदनसिंग गोलवाल यांनी केले. आमच्या महाविद्यालयातील ग्रंथालयात ०१ लाख ग्रंथाची संख्या आहे. त्यात संदर्भ ग्रंथ आहेत. विविध विषयावरील ग्रंथ आहेत. जेष्ठ नागरिकांसाठी वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, पुस्तके वाचनासाठी उपलब्ध आहेत. सकाळी १०.३० ते ५ वाजेपर्यंत जेष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा, ही योजना मोफत चालविली जात आहे. प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे.

या योजनेची माहिती घेण्यासाठी धाराशिवमधील जेष्ठ नागरिक, वाचक, साहित्यिक इतिहास संशोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त विजय गायकवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजेंद्र धावारे, कवी प्रभाकर बनसोडे यांचे मदनसिंग गोलवाल यांनी महाविद्यालयाची माहिती पुस्तिका व स्मरणिका देवून स्वागत केले. ग्रंथालयातील ग्रंथाची माहिती दिली. यावेळी अत्तार शेख, शिवराज राजे गोरे, प्रथमेश भोसले इत्यादींची उपस्थिती होती.

## चाइल्ड हेल्प लाईन १०९८ तर्फे बालहक्क जनजागृती उपक्रम
### जवाहर विद्यालय अणदूर व नगर परिषद शाळा क्र.२१ येथे कार्यक्रम

धाराशिव,दि.१२ नोव्हेंबर (जिमाका) जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय आणि चाइल्ड हेल्प लाईन १०९८ यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव येथील जवाहर विद्यालय, अणदूर तसेच नगर परिषद शाळा क्र.२१ येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.हा उपक्रम प्रभारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री.किशोर गोरे,जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री.ए.बी. कोवे व चाइल्ड हेल्प लाईन प्रकल्प समन्वयक श्री.व्ही.पी.चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधत बालहक्क,बालविवाह,तसेच मुलांच्या समस्या या विषयांवर चर्चा करण्यात आली.बालकांच्या संरक्षणासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती देत,चाइल्ड हेल्प लाईन १०९८ या सेवेशी संपर्क कसा साधायचा याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. चाइल्ड हेल्प लाईन कक्षाच्या समुपदेशिका वंदना कांबळे,ए.डी. काळे व प्रज्ञा बनसोडे यांनी बालकांच्या हक्कांबाबत आणि हेल्पलाईनच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली.तर सूपरवायजर श्रीमती पल्लवी पाटील यांनी १०९८ चाइल्ड हेल्प लाईन कक्षाचे उद्दिष्ट आणि मुलांच्या सुरक्षेसाठी त्याचे महत्त्व सांगितले.

या वेळी प्रशाळेचे मुख्याध्यापक श्री. जी.बी. कुलकर्णी व एस.एस.धोत्रे, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये बालहक्क,सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारी याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

## धमकी देवून केला लैंगीक अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- बेंबळी पोलीस ठाणे एका गावातील ३२ वर्ष महिला दि.२७.१०.२०२५ रोजी हि घरी असताना गावातील एका तरुणाने तिचे घरी येवून अंघोळ करतानाचे छायाचित्रीकरण व्हायरल करण्याची धमकी देवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.१२.११.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## श्रीकाळ भैरवनाथाचा जन्मोत्सवासाठी चित्ताकर्षक फुलांनी सजवला गाभारा



परंडा(प्रतिनिधी)-महाराष्ट्राचे कुलदैवत असलेले श्रीक्षेत्र सोनारी व कंडारी येथील मंदिरात श्रीकाळ भैरवनाथाचा जन्मोत्सव सोहळा मंगळवारी (दि. ११) रात्री १२ वाजता मोठ्या उत्साहात गुलाल पुष्प उधळत साजरा करण्यात आला तसेच विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन मंदिर देवस्थानच्या वतीने करण्यात आले होते.

श्रीक्षेत्र सोनारी येथील श्रीकाळ भैरवनाथ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त मंदिर व मुख्य गाभारा आकर्षक फुलांनी सजवण्यात आला होता. शहरातील येथील परदेशी कुटुंबाच्या वतीने भैरवनाथाच्या विवाह सोहळा तसेच जन्मोत्सवासाठी आकर्षक सुगंधी फुलांचे हार घालण्याचा मान असून ही परंपरा कायम आहे. जन्मोत्सव सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह विविध राज्यातून भाविक दर्शनासाठी येतात मंगळवारी कार्तिक वद्य अष्टमीच्या दिवशी सकाळी ९ वाजता श्रीकाळ भैरवनाथ व माता जोगेश्वरी देवीस महाभिषेक सकाळी १० ते दुपारी १२ महापुजा व वस्त्रपुजा रात्री ८.३० ला महाआरती व नैवद्य, त्यानंतर सकाळी ९ ते १२ या वेळेत जयवंत बोधले महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला. दुपारी १२ ते ३ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रात्री ९.३० ते ११.४५ भालचंद्र देव महाराज (केज) यांचे नारदीय किर्तन झाले. रात्री १२ वाजता गुलाल पुष्प उधळण करीत फटाक्याची आतषबाजी करीत जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला.

यावेळी धर्म, ऋषीमुनी, साधू, संत यांच्या रक्षणाकरता देव देवतांनी भूतलावर अवतार घेतला, असे मत बालाजी महाराज बोराडे यांनी भैरवनाथ जन्मोत्सवानिमित्त आयोजित कीर्तनातून व्यक्त केले. परंडा तालुक्यातील क्षेत्र कंडारी येथे श्री कालभैरवनाथ जन्माष्टमीनिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहातील सातव्या दिवसाची कीर्तन सेवा बालाजी महाराज बोराडे यांची संपन्न झाली. श्री काळभैरवनाथ अष्टमीनिमित्ताने कंडारी ग्रामस्थ यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराजांनी कीर्तनामध्ये बोलताना म्हणाले की, श्री काळभैरवनाथ हा भगवान शिवजीचा अवतार आहे. भक्ताच्या रक्षणाकरिता देव या पृथ्वीतलावर अवतार घेत असतो. श्री काळभैरवनाथाने सोनारी कंडारी या ठिकाणी अवतार घेऊन प्रचंडासूर व सुवर्णासूर या राक्षसांचा वध केला. व येथील ऋषीमुनींना राक्षसांच्या त्रासापासून संरक्षण दिले. श्रीकाळ भैरवनाथ हे काशीचे रक्षपाल, कोतवाल म्हणून ओळखले जातात किर्तना नंतर रात्री बारा वाजता पुष्पवृष्टी होऊन श्री काळभैरवनाथ जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील व महाराष्ट्रातील अनेक भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केलेली पाहायला मिळाली. या वेळी तात्या महाराज हजारे, नामदेव महाराज चव्हाण, प्रमोद महाराज गाढवे, परमेश्वर महाराज घोगरे, प्रदीप महाराज खैरे व समस्त ग्रामस्थ भजनी मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य पुजारी, मानकरी व महिलांनी श्री' चा पाळणा गायला व आरती नंतर पंचखाद्य प्रसाद वाटप करण्यात आला. त्यानंतर महिलांच्या ओटीत फुलांनी सजवलेल्या पाळण्यातील भैरवनाथ ओटीत घालण्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी देवस्थानचे मुख्य पुजारी संजय महाराज, ड.विवेक काळे, समीर महाराज, मयुर महाराज तसेच गावातील मानकरी, सेवेकरी, महिला भाविक भक्त, ग्रामस्थ आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्तिक वद्य नवमी बुधवारी (दि.१२) सकाळी ६ वाजता अभिषेक, सकाळी ७ ते ९ या वेळेत लघुरुद्राभिषेक घालण्यात आला. सकाळी ९.०५ ते १० व १२.३० वाजता महानैवद्य आरती करुन भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्तिक वद्य दशमी गुरुवारी (दि.१३) रोजी सेवेकरी यांना बिदागी वाटप करण्यात येणार आहे.

काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप श्रीक्षेत्र सोनारी व कंडारी येथील मंदिरात एकाच वेळी वद्य आष्टमीच्या रात्री १२ वाजता श्रीकाळ भैरवनाथाचा जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येतो. दोन्ही ठिकाणी मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात येते. कंडारी येथे परंपरेनुसार जन्माष्टमी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे आयोजन करण्यात आले होते. काल्याचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसाद वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली. भैरवनाथाचा जन्मोत्सव सोहळा पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविक भक्ताची मोठी गर्दी केली

## एमबीबीएस विद्यार्थ्यांचा "White Coat Ceremony" उत्साहात संपन्न
### शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे जबाबदार डॉक्टर होण्याची घेतली शपथ

धाराशिव (जिमाका) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे प्रवेशित वर्ष २०२५-२६ च्या १०० एमबीबीएस विद्यार्थ्यांचा "White Coat Ceremony - Rite of Passage" हा समारंभ ११ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्साहात पार पडला.या समारंभात विद्यार्थ्यांना प्रतीकात्मक पांढरा ॲप्रन प्रदान करून WHO-Geneva Convention नुसार विद्यार्थ्यांनी वैद्यकीय प्रतिज्ञा घेतली.या प्रतिज्ञेद्वारे त्यांनी भविष्यात जबाबदार,कुशल व नैतिकतेचे पालन करणारे डॉक्टर होण्याचे वचन दिले.

समारंभास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान, उप-अधिष्ठाता (UG) डॉ.शफीक मुंडेवाडी,विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग,विद्यार्थी तसेच विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान डॉ.योगिता सुलक्षणे,सहयोगी प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र विभाग यांनी संस्थेच्या प्रमुखांची ओळख उपस्थितांना करून दिली.त्यानंतर डॉ. शैलेंद्र चौहान यांनी विद्यार्थ्यांना समारंभाचे महत्त्व स्पष्ट करत वैद्यकीय व्यवसायातील जबाबदारी, नैतिकता आणि सेवाभाव याबाबत मार्गदर्शन केले.

या प्रसंगी मंचावर विभागप्रमुख डॉ. पुष्पा अग्रवाल (बधिरीकरणशास्त्र विभाग),डॉ.धाबे(जीवरसायनशास्त्र),डॉ. स्वाती पांढरे (शरीररचनाशास्त्र), डॉ. चारुशिला हलगरकर (सूक्ष्मजीवशास्त्र), डॉ.लगदीरगायकवाड(औषधवैद्यकशास्त्र), डॉ.चेतनराजपूत(सहाय्यक प्राध्यापक,शरीरक्रियाशास्त्र) तसेच डॉ.विवेक कोळगे (प्रशासकीय अधिकारी) उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्राची जाधव व कु.निशा शिंदे यांनी मानले.या कार्यक्रमाद्वारे नव्या विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय प्रवासाची औपचारिक सुरुवात होताच,परिसरात अभिमान आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले.

## कायदेविषयक जनजागृती व दिव्यांग विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप
### जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व आनंद साधना प्रकल्पाचा उपक्रम

धाराशिव,दि.१२ नोव्हेंबर (जिमाका)जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,आनंद साधना प्रकल्प महाराष्ट्र आणि श्री स्वामी समर्थ मूकबधिर निवासी शाळा,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी आनंद साधना प्रकल्पाच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्या.श्रीमती भाग्यश्री पाटील या उपस्थित होत्या.त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आनंद साधना प्रकल्पाने दिव्यांग बांधवांसाठी केलेली मदत आदर्शवत असल्याचे गौरवोदगार काढले.तसेच दिव्यांग बांधवांनी कायदेशीर सल्ला व मार्गदर्शनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा,असे आवाहन केले.

यावेळी श्रीमती पाटील यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा मोफत टोल-फ्री क्रमांक १५१००,बौद्धिक व मानसिक विकलांगांसाठी १४४४६, तसेच बालकांसाठीच्या मदतवाणी १०९८ या क्रमांकांची माहिती दिली. तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या दिव्यांग व बालकलाभिमुख योजनांबद्दलही जनजागृती करण्यात आली.

आनंद साधना प्रकल्पाचे संस्थापक ड.अजित कुलकर्णी यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या मदत व पुनर्वसन कार्यात प्रकल्प सदैव तत्पर असल्याचे सांगितले.या कार्यक्रमास प्रशिक्षित मध्यस्थ श्री.शकिल शेख, श्री.सुधीर रणशूर,मुख्याध्यापक, तसेच स्थानिक नागरिक,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात अतिवृष्टी बाधित,दिव्यांग विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे किट श्रीमती भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.यावेळी विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांपैकी अथर्व कोकाटे,महेश देवकुळे आणि नंदिनी घोगरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान चौगुले यांनी केले,तर दुभाषक म्हणून रेखा ओहोळ यांनी काम पाहिले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन ड. अजित कुलकर्णी यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी भीमराव पाथरूड, विठ्ठल व्होरडे,संजय म्हमाणे,नागेश चव्हाण आणि श्रीराम पाटील यांनी परिश्रम घेतले.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649